www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 177 वा गुरुवार दि. 13 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




## संत सेना महाराज जयंती साजरी मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर कुं निकाळजे वरूड / जाफ्राबाद**

जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ८ मार्च रोजी शनिवार संत सेना महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली


यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले संत सेना महाराज हे एक वारकरी संप्रदायातील संत असून त्यांना ज्ञानदेव नामदेवांच्या परिवारातील सदस्य म्हणून मानले जात होते त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील बांधवगड मध्ये झालेला आहे संत सेना महाराज हे नाभिक समाजाचे होते ज्ञानेश्वर तुकाराम महाराज इतकेच संत सेना महाराजांना श्रेष्ठ मानले जात होते यावेळी उपस्थित सरपंच सौ, शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे यांचे सुपुत्र शरद तेलंग्रे, ग्रामसेवक सीआय पठाण, उपसरपंच, रहीम टेलर, घरकुल विभाग जाफ्राबाद,कर्मचारी योगेश्वर देवडे, सर, रोजगार सेवक, एम डी गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य, समाधान दामधर, समितीचे सदस्य, विजय देशमुख, राजेंद्र गायकवाड, ज्ञानेश्वर पेंटर, संजय शिंदे, ब्रह्मा शिंदे, महेश शिंदे, सुरेश वखरे, ज्ञानेश्वर झगरे, श्याम वैद्य, गणेश वैद्य, वैभव शिंदे, कृष्णा शिंदे, संतोष राऊत, सतीश झगरे आदी नाभिक समाज व गावकरी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## येरोळ येथे शुक्रवारी सैलानी बाबा यात्रा उत्सव आयोजीत

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ**

: सर्वधर्मीयाचे श्रध्दास्थान असलेल्या येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील सैलानी बाबाची संदल व यात्रा शुक्रवारी होत आहे. तसेच शुक्रवारी पहाटे तीन वाजता येथील पुरोहित महेश देव जोशी यांच्या हस्ते कलशारोहन करण्यात येणार आहे.


सैलानी बाबा

या यात्रेच्या निमित्ताने समाजसेवक डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या वतीने शुक्रवारी सकाळी आकरा ते पाच वाजे पर्यंत मोफत आरोग्य शिबीर घेण्यात येणार आहे. तर सैलानी बाबा यात्रा समितीच्या वतीने पोलीस निरिक्षक विठ्ठल दराडे, तहसिलदार पेद्देवाड, गटविकास अधिकारी बी.टी.चव्हाण, डॉ.अरविंद भातांब्रे, भाजपा ता. अध्यक्ष मगेंश पाटील, गोविंद पोतदार, जेष्ट पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर, उपसरपंच सतिस सिंदाळकर यांच्यासह मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. तसेच या यात्रेनिमित्त विविध खेळाची दुकाणे येणार असुन येणाऱ्या भावीक भक्तासाठी महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. या यात्रेला येरोळ व पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहान पुजारी बब्बण चेबाळे यांच्यासह संभाजी हत्तरगे, मैनोद्दीन मुजेवार, प्रकाश पाटील, राजु पौळकर, उमेश पौळकर यांच्यासह येरोळ येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# 'उदयसिंहां'चं पक्षप्रवेशाचं ठरलं!

## फक्त 'अजितदादां'च्या तारखेचं उरलं; कराड दौऱ्यात काय घडलं?

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बुधवारी कराड दौऱ्यावर आले होते. त्यांनी दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी जयंतीच्या निमित्ताने अभिवादन केले. पण त्यांच्या शासकीय दौऱ्यात नसतानाही त्यांनी काँग्रेसचे नेते अँड. उदयसिंह पाटील यांच्या कोयना सहकारी बँकेत सुमारे १ तास वेळ दिला. २० मिनिटे सभागृह बंद चर्चाही केली तो उत्सुकतेचा विषय आहे. त्यानंतर माध्यम प्रतिनिधिंनी उदयसिंह पाटलांचा प्रवेश कधी ?असे विचारल्यावर मी येथे सदिच्छा भेट द्यायला आलो होतो असे सांगत त्यांनी प्रश्नाला बगल दिली. पण अँड. उदयसिंह पाटलांनी मात्र पत्रकारांशी बोलताना 'आमचं राष्ट्रवादी प्रवेशाचं निश्चित ठरलं आहे, फक्त अजित पवारांच्या तारखेसाठी कार्यक्रमाचं उरलं आहे' असे सांगितले.त्यामुळे आता त्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे.



कराड दक्षिण काँग्रेसचे नेते व दिवंगत विलासराव पाटील (उंडाळकर) यांचे वारसदार अँड. उदयसिंह पाटील यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाच्या चर्चा गेल्या १५ दिवसापासून राजकीय वर्तुळात सुरू आहेत. त्यातच दिवंगत लक्ष्मणराव पाटील (तात्या) यांचे वारसदार खासदार नितीन पाटील व मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी काही दिवसापूर्वी मुंबईत अजित पवार व उदयसिंह पाटील यांची भेट घडवून आणली ती प्रसार माध्यमांपासून लपून राहिली नाही. त्यामुळे उलट सुलट चर्चांना जोर आला.

**अजित पवारांची २० मिनिटे बंददाराआड चर्चा**

त्यातच बुधवारी यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री पवार कराड दौऱ्यावर आले. त्यावेळी त्यांच्या शासकीय दौऱ्यात नसतानाही उदयसिंह पाटील यांच्या कोयना सहकारी बँकेस सदिच्छा भेट दिली. दिवंगत विलासराव पाटील (उंडाळकर) यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन केले. कार्यकर्त्यांशी संवादही साधला आणि अँड. उदयसिंह पाटील व त्यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी २० मिनिटे सभागृह बंद चर्चाही केली. ही चर्चा नेमकी काय झाली? या उत्सुकतेपोटी प्रसार माध्यमांनी अजित पवार यांना उदयसिंह पाटील यांचा प्रवेश कधी? असे छेडले पण त्यांनी मी फक्त सदिच्छा भेटीसाठी आलो होतो असे सांगत लगेच निरोप घेतला.

त्यानंतर माध्यम प्रतिनिधींनी आपला मोर्चा पाटील यांच्याकडे वळवला आणि याच प्रश्नावर त्यांना छेडले. अगोदर आढेवेढे घेणाऱ्या उदयसिंह पाटलांनी अखेर 'हो आमचं प्रवेशाचं ठरलंय, आता फक्त अजित पवारांच्या तारखेसाठी उरलंय' तारीख मिळाली की आम्ही पक्षप्रवेश करू असे सांगून टाकले. त्यावेळी बंद सभागृहात नेमकी काय चर्चा झाली त्याचा सारांश समोर आला. आता उदयसिंह पाटीलांचा **पान २ वर**

## पनवेल येथील जुने मार्केट मधील विविध समस्यांन बाबत श्री गणेश भाजी व फुल व्यापारी संघाने आयुक्त मंगेश चितळे यांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**




श्री गणेश भाजी व फुल व्यापारी संघाचे संस्थापक, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटण तथा मा.नगरसेवक नितीन जयराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल येथील जुने मार्केट मधील विविध समस्यांन बाबत श्री गणेश भाजी व फुल व्यापारी संघाने आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन दिले.

या वेळी संघटनेचे सल्लागार पत्रकार प्रशांत शेडगे, अध्यक्ष कमलाकर मुंडकर,उपाध्यक्ष सोमनाथ इचके, प्रमोद भुजबळ, राजेंद्र म्हसकर, दाजी कोल्हे, बाबूशेट कोंडीलकर, गोरख कारंडे, गणेश ताठे प्रफुल्ल गाला,बाळू शिर्के, नरेश घुमटकर, प्रकाश कुंभार आणि इतर व्यापारी उपस्थित होते. पनवेल येथील जुने भाजी मार्केट हे १०० वर्षा च्या आसपास स्थापन झाले आहे. या मार्केट मद्धे तीन प्रवेशदवार आहेत. या तीनही प्रवेशद्वार वर कमान बांधल्यास मार्केट ला शोभा येईल.त्याच बरोबर या तीनही प्रवेशद्वारा वर कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमावे , जेणे करून चोरी चा प्रकार होणार नाही.पावसाळ्यात मार्केट मद्धे मोठ्या प्रमाणार चिक्खल् होत असतो.त्या करिता मार्केट च्या आत मद्धे पेव्हर् ब्लॉक बसवसल्यास पावसाळ्यात समस्या निर्माण होणार नाहीत.तसेच सुरक्षतेच्या दृष्टी कोनातून मार्केट मद्धे सी.सी.कॅमेरे आणि लाईट बसवल्यास ते खूप उपयुक्त ठरेल. अशी मागणी आयुक्त चितळे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## २० हजराची लाच घेताना बिडकीन महावितरणचे कनिष्ठ अभियंता महेश घावट लाचलुचपत विभागाच्या जाळयात,

### एका आठवड्यात लाचलुचपत प्रकरणात अधिकारी अडकल्याची ही दुसरी घटना.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठणच्या तहसिलदारांचे लाच प्रकरण ताजे असतांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ शाखा बिडकीन येथील कनिष्ठ अभियंता महेश काशिनाथ घावट यांना दि.११/३/२०२५ वार मंगळवार रोजी दुपारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) पथकाने २० विस हजार रुपयाची लाच घेताना रंगेहात पकडले,हि कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी संदीप आटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.एका आठवड्यात पैठण तालुक्यातील हि दुसरी घटना असल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,पैठण छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर धनगाव,टाकळी शेत शिवारात पाच सौर ऊर्जा पंपाच्या प्रस्ताव मंजुरी देण्यासाठी कनिष्ठ अभियंता महेश काशिनाथ घावट (वय ३५) वर्ष शाखा बिडकीन यांनी शेतकऱ्यांकडून २५००० हजार रुपयाची लाच मागणी १० मार्च रोजी मागीतली होती.मात्र तडजोडीअंती २०,००० हजार रुपयाची लाच देण्याचे ११ मार्च रोजी ठरले,आणि बिडकीनच्या शाखे जवळील एका रसवंतीगृहत ही लाचेची रक्कम देण्याचे ठरवले,व ठरल्या प्रमाने तक्रारदार शेतकरी विस हजार रुपये घेऊन ठरल्या ठिकाणी आले आणि स्वतः कनिष्ठ अभियंता महेश काशिनाथ घावट यांनी लाचेची रक्कम रोख विस हजार रुपये घेत असतांना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी कनिष्ठ अभियंता महेश घावट यांना रंगेहात पकडले.यावेळी लाचलुचपत विभागाचे पोलीस अधिक्षक संदीप आटोळे,अप्पर पोलीस अधिक्षक आघाव,पोलीस उपनिरिक्षक सुरेश नाईकनवरे,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केशव दिंडे,पोलीस कर्मचारी आत्मराम पैठणकर,नागरगोजे,चालक ताठे यांनी सापळा रचला,दरम्यान लाचलुचपत विभागाच्या फिर्यादीवरुन बिडकीन पोलीस ठाण्यात अभियंता महेश काशिनाथ घावट यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मूत्रपिंडाच्या आजारापासून बचाव करण्यासाठी 5 महत्तवाच्या टिप्स

## - डॉ अमर कुलकर्णी, नेफ्रोलॉजिस्ट, मेडिकवर हॉस्पिटल्स,

**खारघर, नवी मुंबई**

**दैनिक युवक आधार** - सर्व वयोगटातील लोकांमध्ये मूत्रपिंडाच्या आजाराचे प्रमाण वाढत आहे. चांगल्या आरोग्यासाठी तुमच्या मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखणे गरजेचे आहे. जीवनशैलीत योग्य बदल केलेयास मूत्रपिंडाच्या आजारास प्रतिबंध करता येतो आणि जीवनमान सुधारण्यास मदत होते. भारतातील लाखो लोक मूत्रपिंडाच्या आजाराने पिडीत आहेत. आपल्या शरीरातील कचरा मूत्राद्वारे शरीराच्या बाहेर फेकणे हे याचं मुख्य कार्य असतं. मूत्रपिंड रक्तामध्ये आढळणारे टाकाऊ पदार्थ, शरीरासाठी अनावश्यक असलेले अतिरिक्त खनिजे लघवीवाटे बाहेर काढून टाकते आणि शुद्ध रक्त संपूर्ण शरीरात वितरीत करते. जेव्हा मूत्रपिंडाचे कार्य कमी होते तेव्हा शरीरात हानिकारक विषारी पदार्थ तयार होतात, ज्यामुळे मूत्रपिंड निकामी होण्याच्या गंभीर गुंतागुंत वाढू लागतात. मूत्रपिंडाचा आजार हा मधुमेह, उच्च रक्तदाब, अनुवांशिकता, संसर्ग अशा विविध कारणांमुळे होऊ शकतो. यासाठी वेळीच निदान करणे गरजेचे आहे, कारण सुरुवातील बऱ्याचदा मूत्रपिंडाच्या आजाराची लक्षणे दिसून येत नाही. सामान्य लक्षणांमध्ये पाय किंवा चेहऱ्यावर सूज येणे, लघवीवाटे रक्त येणे, थकवा येणे, मळमळ आणि रक्तदाब कमी- जास्त होणे यांचा समावेश आहे. मात्र ही लक्षणे दिसताच घाबरून जाऊ नका कारण निरोगी जीवनशैलीचा अवलंब करून मूत्रपिंडाचा आजार अनेकदा रोखता येतो. वेळीच निदान केल्याने आजाराची प्रगती कमी होते. तुमच्या मूत्रपिंडास निरोगी ठेवण्यासाठी आणि मूत्रपिंडाच्या आजारापासून बचाव करण्यासाठी याठिकाणी पाच टिप्स देण्यात आल्या आहेत त्याचे तुम्ही पालन करा. भरपूर पाणी प्या व शरीर हायड्रेटेड राखाः तज्ज्ञांनी केलेल्या विविध अभ्यासांनुसार, योग्य हायड्रेशन मूत्रपिंडातील कचरा फिल्टर करण्यास आणि मूत्रपिंडातील खडे ओळखण्यास मदत करते. दिवसातून सुमारे १० ते १२ ग्लास पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यास मदत होते. मात्र गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे टाळले पाहिजे, विशेषतः मूत्रपिंडासंबंधीच समस्या असलेल्या व्यक्तींनी ओव्हरहायड्रेशन टाळा. निरोगी आणि संतुलित आहाराचे सेवन कराः तुम्हाला माहिती आहे का? ताजी फळे, भाज्या आणि तृणधान्ययुक्त समृद्ध आहार निवडल्यास मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत होण्यास मदत होऊ शकते. आहारात अतिरिक्त मीठ, प्रक्रिया केलेले अन्न आणि शर्करायुक्त पेयाचे सेवन टाळा, कारण ते उच्च रक्तदाब आणि मधुमेहासाठी जोखीम घटक ठरतात जे मूत्रपिंडाच्या आजारास **पान २ वर**

# जव्हार येथे आदिवासी मुलींच्या वसतीगृहात अनोख्या उपक्रमाने महिला दिन साजरा

## रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर ) यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते आयोजन

**दैनिक युवक आधार**
**जव्हार/प्रतिनिधी**

संपूर्ण जगभरात ८ मार्च महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विविध ठिकाणी उल्हासात महिला दिन साजरा होत असताना मात्र पालघर जिल्ह्यातील जव्हार येथे अनोख्या सामाजिक उपक्रमांतून महिला दिन साजरा करण्यात आला.रविवार दिनांक ९ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या औचित्याने तज्ज्ञ महिला डॉक्टरांनी सुमारे २०० आदिवासी मुलींना मासिक पाळी आणि स्त्रियांच्या आजाराविषयी मार्गदर्शन केले. यावेळी मुलींना दुर्गम विभागातील महिलांनी बनविलेले सॅनिटरी नॅपकिन चे वाटप करण्यात आले. रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर )यांच्या पुढाकाराने येथील दोन वस्तीगृहांना सॅनिटरी नॅपकिन वापरानंतर दहन करून विघटन करणारी







मशिन्स भेट देण्यात आली. रेसोनिया (पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर ) यांच्या पुढाकाराने आणि नवजीवन फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या सोहळयाला जव्हार पंचायत समितीच्या मा सभापती तथा भाजपा च्या पालघर जिल्हा अध्यक्षा ज्योती हरिश्चंद्र भोये उपस्थित होत्या. तर सुप्रसिद्ध महिला रोग तज्ज्ञ डॉ अनिता पाटील यांनी मुलींना अत्यंत सोप्या शब्दात आणि लाघवी पद्धतीने मार्गदर्शन केले. वसतीगृहाच्या वॉर्डन पुष्पा जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत जुने जव्हार आणि नवीन जव्हार येथे आदिवासी मुलींची दोन वसतिगृहे आहेत. दोन्ही वसतिगृहातील सुमारे २०० मुलींना या उपक्रमाचा लाभ झाला. नवजीवन फाउंडेशनचे वैभव घोलप यांनी देखील उपस्थित मुलींशी संवाद साधत त्यांची सेवाभावी संस्था करत असलेल्या कामाबाबत सार्यांना अवगत केले. रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर ) यांच्या पुढाकाराने एका अत्यंत निकड असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याबद्दल सर्वत्र त्यांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त केली जात होती. कार्यक्रमाचे अंती मुलींच्या हस्ते केक कापण्यात आला. अल्पोपहार झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.या वसतिगृहात **पान २ वर**

## डॉ.अविनाश सकुंडे यांची आंतरराष्ट्रीय इ.व्हि.आणि ए.आय. चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्ष पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**



पुणे येथील डॉ.अविनाश सकुंडे यांची आंतरराष्ट्रीय इ.व्हि.आणि ए. आय. चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्ष पदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली.हा सन्मान जपानची राजधानी टोकियो येथे एका विशेष समारंभामध्ये जपानचे पंतप्रधान यांचे सल्लागार तथा माझी मंत्री कझ्रुयुकि हमाडा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.त्यांची ही नियुक्ती जागतिक स्तरावरील एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.भारताचे पंतप्रधान मान. नरेंद्र मोदी यांनी नुकताच फ्रान्समध्ये पार पडलेल्या ए.आय. समिटमध्ये भाग घेतला होता.यामध्ये त्यांनी प्रामुख्याने फ्रान्स आणि भारताच्या ए. आय. आणि डिजिटल इनोवेशन सहयोगा बाबत नुकतेच निरनिराळ्या बाबींच्या सहयोगावर ठराव केले गेले होते.या ठरावाच्या करारावर मोदींनी मान्यतेच्या करारावर सह्या केल्या होत्या.पंतप्रधान मोदींनी या फ्रान्सच्या भेटीत ए..आय, सायबर क्राईम सुरक्षा, डिजिटल गव्हर्नन्स याबद्दल भारताला सशक्त बनवण्याच्या दृष्टिकोनाने महत्त्वाचे पाऊल मानले जाते. विविध क्षेत्रात डॉ.अविनाश सकुंडे यांचे नेतृत्व कौशल्य तसेच दूरदृष्टी व इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स फेडरेशनच्या माध्यमातून अनेक नव उद्योजकांना केलेल्या मदतीचे तसेच मार्गदर्शनाचे आंतरराष्ट्रीय आढावा घेत ही ए.आय. तसेच ई.व्हि.चेंबर्स ऑफ कॉमर्स या संस्थेचा प्रचार आणि प्रसार भारताकरता एका नवीन उंची वरती नेऊन ठेवतील यात शंका नाही.नवीन अध्यक्षांना जपान पंतप्रधानांचे सल्लागार तथा माजी मंत्री कझ्रुयुकि हमाडा यांनी शुभेच्छा दिल्या.भविष्यकाळात संस्थेचे ध्येयधोरण जास्तीत जास्त नवीन उद्योजकांना यात सहभागी करून संस्थेचे नाव उज्वल्य करावे ही आशा व्यक्त केली.संबंधित नियुक्ती करताना जपानमध्ये विविध उद्योजकांनी डॉ.संकुडे यांना शुभेच्छा दिल्या.

# रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर ) यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते आयोजन

**पान १ वरुन** दुर्गम ग्रामीण विभागातील मुली राहात असतात. उमलत्या वयात त्यांच्या मनात असंख्य शंका कुशंका उठत असतात. अशा प्रकारच्या थेट संवाद कार्यक्रमातून आदिवासी समाजातील मुलींच्या लैंगिक शिक्षणात मोलाची भर पडणार आहे. लैंगिक आजाराबाबत मुलींच्या मनात असणारे गैरसमज,अंधश्रद्धा दूर करण्यासाठी डॉ अनिता पाटील यांनी सोप्या शब्दात अगदी मोकळा ढाकळा संवाद साधला. तसेच उपस्थित मुलींना आहार,सवयी आणि स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर ) यांच्या सी एस आर फंडातुन यावेळी दोन्ही वसतिगृहांना वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिन चे दहन करून विघटन करणारी मशिन्स भेट देण्यात आली.सदर मशिन्स चे वापराने निर्जंतुकीकरण स्तर उंचावला जाईल. अशा प्रकारे थेट संपर्क साधत सामाजिक उपक्रम राबविण्याची हि पहिलीच घटना असावी. रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर) यांच्या पुढाकाराबद्दल ज्योती भोये यांनी त्यांचे आणि कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला जव्हार पंचायत समितीच्या मा सभापती तथा भाजपा च्या पालघर जिल्हा अध्यक्षा ज्योती भोये, सुप्रसिद्ध महिला रोग तज्ज्ञ डॉ अनिता पाटील,नवीन जव्हार वस्ती गृहाच्या वॉर्डन पुष्पा जाधव,जुने जव्हार येथील वसतिगृहाच्या लिपिक उर्मिला वाघ तसेच टीम रेसोनिया ( पूर्वाश्रमीची स्टरलाइट पॉवर ) यांची प्रमुख उपस्थिती होती.

# - डॉ अमर कुलकर्णी, नेफ्रोलॉजिस्ट, मेडिकवर हॉस्पिटल्स,

**पान १ वरुन** कारणीभूत घटक आहेत. बेरीज, पालेभाज्या आणि काजू यांसारखे मूत्रपिंडास अनुकूल अन्न पदार्थांचा आहारात समावेश करा. रक्तातील साखर उच्च पातळी आणि उच्च रक्तदाबाचे वेळोवेळी निरीक्षण करा.आहार, व्यायाम आणि औषधांसह (जर आवश्यक असेल तर) रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियमितपणे तपासणे आणि व्यवस्थापित करणे, योग्य राहिल जे मूत्रपिंडावरील दाब कमी करते आणि मूत्रपिंडाचे दीर्घकालीन नुकसान टाळते. वजन नियंत्रित राखा व नियमित व्यायाम कराः शारीरिक हालचाली रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करतात, मूत्रपिंडांवरील ताण कमी करतात आणि रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. आठवड्यातून पाच वेळा किमान ४५ मिनिटे चालणे, पोहणे किंवा सायकलिंग करा. नियमित आरोग्य तपासणीसाठी कराः मूत्रपिंडाच्या समस्या वेळीच ओळखणे आणि वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, विशेषतः मधुमेह आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर ठरते. तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी नियमितपणे संपर्कात रहा आणि मूत्रपिंडाचे चांगले राखा.डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक औषधे घेणे टाळा. या पाच टिप्सटे पालन करून, तुम्ही तुमच्या मूत्रपिंडांचे आरोग्य चांगले राखु शकता आणि मूत्रपिंडाच्या आजाराचा धोका कमी करून निरोगी जीवन सुनिश्चित करू शकता.

# ‘उदयसिंहां’चं पक्षप्रवेशाचं ठरलं!

**पान १ वरुन** प्रवेशाचा मुहूर्त कधी निघणार? याचीच प्रतीक्षा उरलेली आहे.

**उदयसिह पाटलांना नेमकी काय दिलीय ऑफर?**

अजित पवारांनी कोयना बँकेला भेट दिली. पाहुणचारात त्यांनी ‘खाल्ले ‘कोयने’चे पेढे अन ‘रयत’ची साखर, पण ‘उदयसिंहां’ना नेमकी काय दिलीय ऑफर?’ याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. याबाबत उदयसिंह पाटील यांनी मी काही मागणी केलेली नाही आणि त्यांनी काही शब्द दिलेला नाही असे जरी म्हटले असले तरी, विधान परिषदेवर संधी देण्यात येणार असल्याचे त्यांच्याच रयत संघटनेचे कार्यकर्ते खाजगीत सांगत आहेत.

**पक्षप्रवेश अधिवेशनापूर्वी की नंतर?**

सध्या राज्य सरकारचे अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे अजित पवार त्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी की अधिवेशन संपल्यानंतर ते उदयसिंह पाटलांना कार्यक्रमाची तारीख देणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

अजूनही मी काँग्रेसमध्येच अजित पवारांच्या भेटीनंतर माध्यम प्रतिनिधींनी उदयसिंह पाटील यांना आज काँग्रेसचा एक कार्यक्रम आहे. त्या कार्यक्रम पत्रिकेवर तुमचं नाव आहे. तुम्ही त्या कार्यक्रमाला जाणार आहात का? याबाबत छेडले असता अजून मी काँग्रेसमध्येच आहे. त्यामुळे कार्यक्रमाला जाणार असलेचे सांगितले. त्यावेळी एकच हशा पिकला.

# अ .भा. स कडून आगरातील ओजस्विनी या पुरस्काराने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## आगरातील ओजस्विनी हा महिला दिन विशेष कार्यक्रम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित महिला दिन विशेष कार्यक्रम रविवार दिनांक ९ मार्च रोजी खारपाडा येथील हंसाराम बुवा फार्म वर ज्येष्ठ साहित्यिक श्री सुरेश भोपी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या सुरुवातीस अमृत पाटील यांनी ईशस्त्वन सादर केले.गजानन म्हात्रे यांनी प्रास्ताविक भाषण सादर केले. अ.भा.स.चे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.आगरातील ओजस्विनी या नावाने महिला दिनाचे औचित्य साधून सौ.मीनाक्षी तांडेल, सौ. संध्या दिवकर,सौ. रेखा थळे या

कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. चंद्रकांत पाटील,अविनाश पाटील, मिनाक्षी तांडेल, संध्या दिवकर,शोभा पाटील,यांनी आपल्या भाषणातून आगरी महिलांचे कर्तृत्व व आगरी संस्कृती या बाबतचे आपले विचार मांडले. आगरी संस्थेद्वारा दिनांक ११ एप्रिल रोजी भूतानच्या थिंफू राजधानीत आंतरराष्ट्रीय आगरी अस्मिता साहित्य संमेलन संपन्न होणार असल्याचे संस्थाध्यक्ष कैलास पिंगळे यांनी जाहीर केले.गजानन म्हात्रे हे कार्याध्यक्षपदावर काम करणार असून,सौ.स्मिताताई वाजेकर यांच्या शुभहस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून अमृत पाटील अध्यक्ष असणार आहेत. संमेलनात आगरी बोली या विषयावर परिसंवाद होणार असून, कविता सादरीकरणासोबतच अनेकविध पुस्तकांवर साहित्यिक चर्चा झडणार आहेत. अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ साहित्यिक, तथा कवीवर्य श्री सुरेश भोपी यांनी पुरस्कार प्राप्त महिला यांच्यात ओजस्विनी बाणा दिसून आल्याचे सांगून आगरी साहित्यिकांना एकत्र आणण्याचे श्रेय कैलास पिंगळे सराना दिले .याचबरोबर श्री मिलिंद खारपाटील यांच्या निर्भिड आणि तत्पर पत्रकारितेचे कौतुक केले. आगरातील ओजस्विनी या महिला दिन विशेष कार्यक्रमात कैलास पिंगळेअलिबाग,मिलिंद खारपाटील ..चिरनेर,अरुण धर्माजी पाटील पेण ,सौ.संध्या विजय दिवकर रोहा ,सौ.स्मिता वाजेकर नवीमुंबई,चंद्रकांत पाटील पेण,सुरेश भोपी कामोठे,भ पो म्हात्रे उरण ,दिनानाथ पाटील पेढांबे,सौ मिनाक्षी तांडेल, नवीमुंबई ,अविनाश पाटील, पनवेल, अरविंद पाटील रोहा ,गजानन म्हात्रे नेरुळ,मारुती बागडे कर्जत,सौ रेखा चंद्रशेखर थळे अलिबाग,जी,एच ठाकुर, दादर पेण ,अमृत पाटील नेरूळ अरुण द म्हात्रे जासई,नंदेश गावंड, अलिबाग सौ.तृप्ती नंदेश गावंड, अलिबाग या कवींनी सुरेख अशा कविता सादर करून सर्वांना खुर्चीस खिळवून ठेवले. रेखा चंद्रशेखर थळे यांनी धवळेगीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.नंदेश गावंड व तृप्ती नंदेश गावंड या उभयतांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.





# एकल वापराच्या प्लास्टिकच्या विरोधात ठाणे महानगरपालिकेची कारवाई.

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव - ठाणे**



ठाणे (ता १२) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यासाठी एकल वापराच्या प्लास्टिकच्या विरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. नौपाडा, वागळे इस्टेट आणि माजिवडा-मानपाडा या तीन प्रभाग समिती क्षेत्रात १००२ दुकानांची तपासणी करण्यात आली. त्यात ७८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून २७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक होळी साजरी करताना एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी महापालिकेने प्रभाग समिती निहाय कारवाई सुरू केली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग व प्रभाग समितीतील कर्मचारी यांच्या समन्वयाने ही कारवाई सुरू असून इतर प्रभाग समिती क्षेत्रातही कारवाई केली जात असल्याचे प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान यांनी सांगितले.

दरम्यान, ०१ एप्रिल, २०२४ ते ०६ मार्च, २०२५ या काळात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि ठाणे महानगरपालिकेच्या प्रदूषण नियंत्रण कक्षाचे प्रतिनिधी यांनी एकल वापराच्या प्लास्टिकच्या बंदीबाबत मोहीम हाती घेण्यात आली. त्यात, एकूण ४१८० आस्थापनांना भेट दिली. त्यातून २१३९ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तर, दंडापोटी १३ लाख ५६ हजार ६०० रुपये वसूल करण्यात आले.

# टेकवडी ग्रामपंचायत कडून शासकीय निमशासकीय उपक्रमांचे सरपंच कडून आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे.**



आज दिनांक 11 3 2025 रोजी ग्रामपंचायत टेकवडी महाराष्ट्रातील दुसरे सौर ग्राम या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी जे यशदा मध्ये प्रशिक्षण घेत आहेत त्यांच्यातर्फे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले सदर आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांची तपासणी करून योग्य तो वैद्यकीय सल्ला देण्यात आला सदर कार्यक्रमास पंचक्रोशीतील अनेक महिला व पुरुष सहभागी होऊन आपली आरोग्य तपासणी करून घेतली सदर कार्यक्रमास माननीय कलशेट्टी साहेब उपमहासंचालक यशदा यांनी उपस्थित राहून आरोग्य अधिकाऱ्यांना आरोग्य अधिकारी यांना मार्गदर्शन केले मार्गदर्शन केले तसेच अंगणवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून CSR मधून निधी उपलब्ध करून सदर शाळेला लागणारे भौतिक सुविधा उपलब्ध करून शाळेचा दर्जा उंचावण्याचा उंचावण्यासाठी उंचावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले तसेच टेकवडी गाव दत्तक घेतल्याचे सांगितले त्याचबरोबर रोटरी क्लब तर्फे लागवड केलेल्या चार हजार झाडांची पाहणी करून कृषी पर्यटन केंद्र सुरू करण्यासाठी योग्य मदत व मार्गदर्शन करण्यात येईल सदर कार्यक्रमास माननीय विशाल शिंदे, गट विकास अधिकारी पंचायत समिती खेड यांनीही उपस्थित राहून मार्गदर्शन केले सरपंच विठ्ठल शिंदे यांनी आजपर्यंत केलेल्या विकास कामांची माहिती दिली टेकवडे हे गाव महाराष्ट्रातील दुसरे व पुणे जिल्ह्यातील पहिले सौर ग्राम ठरले आहे पंचायत समिती विसराधिकारी सुभाष भोकटे ग्रामपंचायत अधिकारी मधुकर डवणे सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल येवले हे उपस्थित होते सूत्रसंचालन यशोदा चे व्याख्याते वामन बाजारे यांनी केले

# मेहनतीचा महामेरू: कडुभाऊ काळे यांचा प्रेरणादायी प्रवास..

## नागेबाबा उद्योग समूह आणि मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना

**प्रेरणादायी जीवनकथा**

कडुभाऊ छगन काळे यांचा जीवनप्रवास हा जिद्द, कष्ट आणि आत्मविश्वासाचा जाज्वल्य आदर्श आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी कष्ट आणि चिकाटीच्या जोरावर माणूस यशस्वी होऊ शकतो, याचे ते जिवंत उदाहरण आहेत.

**बालपण आणि संघर्ष**

कडुभाऊ यांचे बालपण अतिशय हालाखीच्या परिस्थितीत गेले. गरिबी इतकी होती की, दोन वेळच्या जेवणासाठीही त्यांना धड पैसे मिळत नव्हते. मात्र, त्यांच्या आई-वडिलांनी त्यांच्यात मेहनतीचे आणि प्रामाणिकतेचे संस्कार रुजवले होते. लहानपणापासूनच त्यांनी जीवनाच्या कठीण वास्तवाला सामोरे जाण्यास शिकले.

**मेहनतीचा प्रारंभ**

गरिबीमुळे शिक्षण पूर्ण करता आले नाही, पण त्यांनी परिस्थितीवर दोष न ठेवता हाताला काम दिले. कधी गवत कापून विकले, तर कधी भाजी विक्री केली.




कोणतेही काम लहान नाही, हे त्यांना ठाऊक होते. मेहनतीला पर्याय नाही, हे त्यांनी लवकरच ओळखले.

त्यांची जिद्द इतकी प्रबळ होती की, प्रत्येक दिवशी नव्या जोमाने कामाला लागत. कधी एखाद्या शेतकऱ्याच्या बांधावर काम करायचं, कधी बाजारात भाजी विकायची, तर कधी मजुरी करायची—त्यांना कोणतेही काम कमीपणाचे वाटले नाही.

**यशाचा पहिला टप्पा - सरपंचपद**

असा मेहनतीचा हा प्रवास सुरू असताना गावातील लोकांनी त्यांच्या सचोटीला आणि परिश्रमाला ओळखले. लोकहिताचे विचार आणि सामाजिक कार्य यामुळे त्यांचा प्रभाव वाढत गेला. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे गावकऱ्यांनी त्यांना सरपंच म्हणून निवडले.

सरपंच झाल्यानंतर कडुभाऊंनी गावाच्या विकासासाठी भरपूर काम केले. शेती, पाणीपुरवठा, शिक्षण, आणि ग्रामविकास या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे गावाची परिस्थिती सुधारू लागली.

नागेबाबा उद्योग समूह आणि मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना...

सरपंचपदाच्या माध्यमातून मिळालेल्या अनुभवाने त्यांना समाजासाठी काहीतरी भव्य करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी ‘श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट को. ऑप. सोसायटी’ ची स्थापना केली. ही सोसायटी गावकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी एक वरदान ठरली.

या संस्थेच्या माध्यमातून अनेक ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक मदत मिळू लागली. कडुभाऊंनी पारंपरिक शेतीव्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक लघुउद्योग, सहकारी संस्था आणि विविध विकास प्रकल्प उभे राहिले.

कडुभाऊंनी अगदी शून्यातून सुरुवात करून एक यशस्वी उद्योजक आणि समाजसेवक म्हणून स्वतःला सिद्ध केले. ज्यांनी कधी गवत विकून जगण्याची सुरुवात केली, ते आज हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करून देत आहेत.

त्यांचा हा संघर्ष आणि त्यातून मिळालेले यश आजच्या तरुण पिढीसाठी एक मोठा प्रेरणास्त्रोत आहे. "मेहनत, प्रामाणिकपणा आणि जिद्द असेल, तर कोणतीही परिस्थिती आपल्या स्वप्नांच्या आड येऊ शकत नाही." — हेच कडुभाऊंच्या जीवनातून शिकण्यासारखे आहे.

कडुभाऊ काळे यांनी गरिबीवर मात करून फक्त स्वतःचेच नव्हे, तर हजारो लोकांचे जीवन उज्ज्वल केले. त्यांचे जीवन म्हणजे खऱ्या अर्थाने मेहनतीचा महामेरू!

त्यांची ही प्रेरणादायी कथा नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे आणि सांगते की, "स्वतःवर विश्वास ठेवा, कठोर मेहनत घ्या, आणि कोणतीही गोष्ट अशक्य नाही!"

# दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे हि आमची तळमळ - लोकनेते रामशेठ ठाकूर

## लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अड. भगीरथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १२) मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्पर्धा, विद्यापीठ स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातून यशस्वी झालेला विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दातृत्व, कर्तुत्व आणि मातृत्व या तीनही गोष्टींचा संगम असणारे व्यक्तिमत्व आणि मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रयत शिक्षण संस्था सातारा, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते. यावेळी त्यांनी विद्यापीठ




व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत, महाविद्यालयीन स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून या महाविद्यालयासाठी काहीही कमी पडणार नाही याची दक्षता आम्ही घेऊ असे ते यावेळी म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी आणखी वीस लाख रुपये देणगी जाहीर केली. गेल्या ४० वर्षात या ठिकाणी शिक्षणासाठी खूप अडचणी होत्या पण त्या या महाविद्यालयाच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षात भरून निघाल्या असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले. आजचे युग स्पर्धेचे आहे आणि या स्पर्धेत तळागाळीत दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षमपणे सामोरे जायला पाहिजे, ही आमची तळमळ असते त्यामुळे आपल्याकडून जेवढे करता येईल तेवढी मदत झाली पाहिजे हा उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या ठिकाणी गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांना मिळालेली बक्षिसांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, त्यामुळे निश्चितच या महाविद्यालयाने शिक्षणासह इतर क्षेत्रातही वेगाने विकास केला असल्याचे गौरवोद्गारही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले. व्हाईस चेअरमन अड. भगीरथ शिंदे यांनी सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये आपली संस्था ही महत्त्वाचे कार्य करीत आहे. म्हणून पारंपरिक शिक्षणाबरोबरच आपण तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण घेणे खूप गरजेचे आहे. त्याचबरोबर बदलत्या काळाबरोबर आपण बदललो पाहिजे ते मानवजातीच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. असेही ते यावेळी म्हणाले. कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता जिद्द ठेवून चिकाटीने अभ्यास करीत रहा. नक्कीच तुम्ही ठरवलेल्या ध्येयापर्यंत पोहोचणार, असा सल्लाही शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला. पालघर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. या सोहळ्याची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एन चांदोरे यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील उल्लेखनीय कार्य व विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'लोकनेते रामशेठ ठाकूर पुरस्कार' सीनियर प्रा. एस. ई. सैंदनशिव तर महाविद्यालयातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल या वर्षीचा 'अड. भगीरथ शिंदे पुरस्कार' ज्युनिअर प्रा. एस. ए. फुंदे यांना प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महाविद्यालय विकास समिती सदस्य कुणाल लाडे, महाविद्यालयाचे उपप्रचार्य प्रा. एस. ई. सैंदशिव, उपप्राचार्य डॉ. एस. जी. मेंगाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. व्ही. एम. मोरे, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. एस. एच. जाधव, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, रयत शिक्षण या संस्थेच्या आश्रम शाळेचे प्रकल्प अधिकारी काकूळते सर, शेळके सर, काजळे सर, लंके सर, वाघमारे सर, हनीफ शेख, संदीप निकम, काशिनाथ कान्हव, फारुख पिंजारी, प्रशांत पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

# सामाजिक बांधिलकीचा वसा यवतमाळ जिल्ह्यात मधु ताराच्या कार्याचा ठसा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

दिनांक १० मार्च २०२५ रोजी हिवरा संगम तालुका हातगाव जिल्हा यवतमाळ येथे सदगुरू श्री अडाणेश्वर महाराज मंदिर येथे मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशनचा आरोग्य दिव्यांग मार्गदर्शन कार्यक्रम असंख्य ग्रामस्थ मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी आरोग्यावर तसेच दिव्यांग यांच्या साठी असणारे शासकीय योजना आणि मधु तारा यांच्या माध्यमातून होणारे कार्य यांच्या वर कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष म्हणून आपले विचार मांडले.तसेच निराधार. रोजगार. दिव्यांगांसाठी असणारे कार्य याची माहिती देत आज देवाला सुट्टी आहे ही कविता आणि हृदयस्पर्शी गीत सादर केले.अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम पार पडला.या प्रसंगी यवतमाळ जिल्हा प्रमुख म्हणून युवा रुग्ण मित्र श्री राजकुमार केंद्रे यांची नियुक्ती पत्र मधु तारा प्रमुख यांनी दिले.तसेच अतिशय चांगल्या पद्धतीत कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल श्री राजकुमार केंद्रे यांचे अभिनंदन मधु तारा प्रमुखांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना शिवसेना शिंदे गटाचे हिवरा संगम गावाचे श्री किशोरजी घाटोळे यांनी केले. यावेळी प्रगत शेतकरी श्री हरी दादा केंद्रे. मा.सरपंच काहूरवाडी श्री विजयजी वळसेपाटील.मराठा सेवा संघ यवतमाळ जिल्हा सचिव डॉ.श्री संदिपजी शिंदे. रस्तभाव धान्य दुकान महागाव तालुका अध्यक्ष श्री निळकंठजी लेवाळकर.प्रगत शेतकरी श्री शेख नजीबजी हुसेन तसेच मोठ्या प्रमाणात पंचक्रोशीतील मान्यवर आणि दिव्यांग बंधू भगिनी यांची उपस्थिती होती.

मधु ताराने सांगितलेल्या योजना आणि कार्य आमच्या पर्यंत पोहचावे याकरीता पुण्यावरून येऊन आम्हाला मोलाचं *मार्गदर्शन केलं यासाठी आम्ही समस्त ग्रामस्थ तालुका मधु तारा फाऊंडेशनचे आभार व्यक्त करतो व नेहमी सोबत राहून कार्य करू असे जाहीर करतो असे समस्त ग्रामस्थ म्हणाले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# थोडक्यात

## मोरया चषक" (पर्व 2 रे) क्रिकेट स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: ९ मार्च २०२५ रोजी नवीन पनवेलमध्ये मोरया बॉईज आणि मोरया चषक समितीने आयोजित केलेली "मोरया चषक" क्रिकेट स्पर्धा नवीन पनवेलमधील सुकापूर येथील सॉकर सिटी टर्फ येथे रोमांचकपणे संपन्न झाली. स्पर्श वॉरियर, जान्हवी जग्वार, ओंकार स्ट्रायकर्स, अर्चित पँथर्स, अरबाज एसेस, सिया सुपर स्ट्रायकर्स, साई युवी फायरबर्ड, विनय स्टार्स या स्पर्धेत मुंबई आणि नवीन पनवेलमधील आठ संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामना स्पर्श वॉरियर आणि साई युवी फायरबर्ड यांच्यात झाला, ज्यामध्ये स्पर्श वॉरियरने ४ गडी राखून विजय मिळवला. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल स्पर्श वॉरियरचा हिमांशु म्हात्रे याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ( मालिकावीर) म्हणून घोषित करण्यात आले. या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीचे प्रदर्शन झाले, ज्यामध्ये स्पर्श वॉरियरचा कर्णधार राहुल हिरावेने ५ डावात १०९.०० च्या सरासरीने १०९ धावा केल्या म्हणून त्याने उत्कृष्ट फलंदाज म्हणून निवडण्यात आले आणि सतीश जाधवने ५ डावात ७.६० प्रति षटकाच्या इकॉनॉमीसह ७ बळी घेतले म्हणून त्याने उत्कृष्ट गोलंदाज म्हणून निवडण्यात आले. मोरया चषक' स्पर्धेच्या यशाने आम्हाला खूप आनंद झाला आहे," असे मोरया चषकच्या आयोजन समितीने म्हटले आहे. "या कार्यक्रमाने स्थानिक क्रिकेट प्रतिभेला चमकण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहेच, तसेच खिलाडूवृत्ती आणि निरोगी स्पर्धेलाही चालना दिली आहे. यावेळी फर्स्ट चॉईसचे मालक मोहम्मद शाहिद उपस्थित होते.

## महाबॅंकेतील कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

बँकिंग उद्योगातील बहुसंख्य असलेली संघटना ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनशी संलग्न असलेली संघटना ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडेरेशनने सध्या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये आंदोलन पुकारले आहे. ह्या आंदोलनाच्या शृंखलेत आज बँकेच्या भारत भरातील सर्व झोन मध्ये आज धरणे देण्यात आली. ह्या अनुषंगाने बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज मुंबईने आज बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये मुंबई दक्षिण , उत्तर, ठाणे आणि नवी मुंबई येथील झोनल ऑफिस समोर निदर्शने व धरणे करण्यात आली. याप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष, अरविंद मोरे, असिस्टंट सेक्रेटरी , किशोर सावंत, संघटन सचिव, पांडुरंग भोगले, भिकू जाधव, केदार म्हात्रे, जगदीप वाघचौरे, संतोष जगताप, भूषण भागवत, दिशा घाग आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्ष, अरविंद मोरे यांनी संघटना ही बँकेत कर्मचाऱ्यांची लिपिक, शिपाई, पी.टी.एस. भरती, डी ज्युरी कराराची अंमलबजावणी, द्विपक्ष बोलणी, कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी, स्पेशल असिस्टंट पदाच्या जागा भरणे व ताब्यात घेतलेली युनियन ऑफिस परत मिळविण्या करीत आंदोलन करत असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की संघटनेचे आंदोलन हे देशभक्तीचे आंदोलन आहे कारण की, ते ग्राहकांना चांगली ग्राहक सेवा मिळण्यासाठी आंदोलन करत आहेत. जर मागण्या पूर्ण झाल्या नाही तर २० मार्च ला संप करून आंदोलन अधिक तीव्र होईल असे सांगितले. तसेच संघटना १७ मार्चला बँकेच्या हेड ऑफिस लोकमंगल, पुणे येथे धडक मोर्चा नेणार असल्याचे सांगितले. निदर्शनात बँकेतील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपला असंतोष धरणे आणि निदर्शनाच्या माध्यमातून दर्शविला. याप्रसंगी संघटने तर्फे सर्व झोनल मॅनेजर यांना निवेदन देण्यात आली.

## धर्माबाद येथे फसवणूक करून नेलेला 16 लाख 69 हजारांचा हरभरा धर्माबाद पोलिसांनी व्यापाऱ्यास केले परत..

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी**
**गिरमाजी सुर्यकार**

दि. 28 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती येथून मनश्री ट्रेडिंग कंपनी येथून हरभरा हे ट्रक क्र. MH-21-BH-8776 यात भरून ट्रक चालक गणेश मोरे (खोटे नाव) व इतर एकजण वजनकाटा करून 595 पोते ज्याचे वजन 305 क्विंटल 30 किलो वजनी 16,69,150 रु. चा हरभरा फसवणूक करून नेला होता, सदरचा मुद्देमाल पोलिसांनी तपास करत परत आणले. आज रोजी दुपारी 1 च्या सुमारास हा माल फिर्यादी व्यापाऱ्यास परत दिला यावेळी पोलीस अधिकारी यांचा समस्त व्यापाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# संस्थांनी एकत्र येऊन समाज कार्य करावे – सी. ए. शंकर अंदानी

**- दैनिक युवक आधार प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर** – समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या सामाजिक संस्थांनी एकत्रित येऊन देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन सी. ए. शंकर अंदानी यांनी केले. SITA (SAAI INDIAN TRUST ASSOCIATION) ट्रस्ट यांच्या वतीने ९ मार्च २०२५ रोजी राणा एक्झिक्युटिव्ह हॉटेल, मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर येथे CSR फंड आणि शासकीय प्रकल्पांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत सामाजिक संस्थांसाठी आवश्यक असलेल्या विविध कागदपत्रांची माहिती, शासकीय अनुदान प्रक्रिया, CSR प्रकल्पांची संधी, निविदा प्रक्रियेचे मार्गदर्शन, तसेच नीती आयोग अंतर्गत दर्पण नोंदणी आणि FCRA नोंदणी प्रक्रियेविषयी तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आले.

**CSR प्रकल्प आणि शासकीय अनुदानावर मार्गदर्शन**

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी सी. ए. शंकर अंदानी होते. त्यांनी सांगितले की, "संस्थांनी सामाजिक कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी शासकीय आणि खाजगी कंपन्यांच्या CSR फंडाचा योग्य प्रकारे उपयोग केला पाहिजे. शासकीय अनुदान प्रक्रिया समजून घेतल्यास संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन अधिक चांगल्या प्रकारे समाजसेवा करू शकतात."
यावेळी अहिल्यानगरचे कर सल्लागार श्री. दीपक चौधरी यांनी संस्थांना आवश्यक असलेल्या १२A, ८०G, FCRA आणि नीती आयोग नोंदणी प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. तसेच CSR प्रकल्पांसाठी अर्ज करण्याच्या पद्धती आणि त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांविषयी सखोल माहिती दिली.

**संस्थांच्या विकासासाठी सहकार्याची आवश्यकता**

सी. ए. शंकर अंदानी पुढे म्हणाले की, "भारताच्या पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी सामाजिक संस्था तळमळीने कार्य करत आहेत. देशाच्या विकासासाठी संस्था एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. यामुळे केवळ सामाजिक परिवर्तनच नाही, तर आर्थिक प्रगतीही साधता येईल."

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमात मदत फाउंडेशनचे अध्यक्ष अरुण भाई शेख, राफाइल फाउंडेशनचे राजेश सक्सेना, आधार वृद्धाश्रमचे धनेश डोणगावकर, केशर महिला संस्थेचे कार्याध्यक्ष अमृत उबेधळ, द्वारकामाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजू खाजेकर यांसह अनेक सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी आणि अहिल्यानगर येथून आलेल्या मान्यवरांनी संस्थांच्या विकासासाठी




अशा कार्यशाळांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे संयोजन सीता ट्रस्टचे अध्यक्ष सी. ए. शंकर अंदानी आणि मदत फाउंडेशनचे अध्यक्ष हारुन भाई शेख यांनी केले. त्यांनी उपस्थितांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

## .. नळदुर्ग येथे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाची तालुका बैठक पार पडली..



**दैनिक युवक आधार**
**--संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

धाराशिव जिल्ह्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख श्री. सुनीलजी काटमोरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली दि.१२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नळदुर्ग येथे अंबाबाई मंदिर या ठिकाणी तुळजापूर तालुका शिवसेने ची बैठक घेण्यात या बैठकीला तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी धाराशिव जिल्ह्याचे महिला जिल्हा संघटक शामलताई वडणे माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण तुळजापूर शहर प्रमुख सुधीर कदम नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले डॉ. जितेंद्र कानडे हे उपस्थित होते यावेळी तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी उपतालुकाप्रमुख कृष्णात मोरे संतोष पुदाले डॉ जितेंद्र कानडे शामलताई वडणे कमलाकर चव्हाण या सर्वांनी आपले विचार व्यक्त केले त्यानंतर धाराशिव जिल्ह्याचे संपर्कप्रमुख सुनीलजी काटमोरे साहेब यांनी या बैठकीमध्ये येणाऱ्या पुढील जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत नगरपालिका निवडणुकीमध्ये येणाऱ्या काळामध्ये जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य संरपच ग्रामपंचायत सदस्य नगरसेवक जास्तीत जास्त शिवसेनेच असले पाहिजे असे सांगितले आहे तसेच काही आमदार आणि खासदार शिवसेनेतून निघून गेले आणि शिवसेनेसोबत गद्दारी केले परंतु निष्ठावंत शिवसैनिक मात्र पडत्या काळामध्ये उद्धव साहेब ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणाने असल्याचे सांगितले आहे अशा शिवसैनिकांचा मला गर्व आहे सांगितले आहे या बैठकीसाठी उपतालुकाप्रमुख सुनील जाधव सरदार सिंग ठाकूर तुळजापूर महिला शहराध्यक्ष महिला पदाधिकारी तसेच शिवाजी कदम दत्ता भोसले कुमार मोरे बलभीम मन शेट्टी यशवंत पाटील सुनील कदम सुधाकर काळे संजय चव्हाण परमेश्वर चिनगुंडे संतोष मोटे बलभीम शिरगिरे तानाजी पाटील पांडुरंग पाटील शाम कनकधर सोमनाथ म्हेत्रे नेताजी महाबोले नितीन राठोड राजेंद्र जाधव (मेंजर) भिकाजी जाधव सर्व शिवसैनिक उपस्थित होते या कार्यक्रमचे प्रस्ताविक संतोष पुदाले यांनी केले तर कार्यक्रमचे आभार सरदार सिंग ठाकूर यांनी मानले

## महिला दिनानिमित्त सुर ताल आणि नृत्याचा संगम ,सादर झाला कलेचा नजराणा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

८ मार्च म्हणजे हा दिवस समस्त महिलांचा हक्काचा, सन्मानाचा , त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्याचा आयुष्यभर मुलांसाठी झटते ती आई, आपल्या भावाच्या पाठीशी उभी रहाते ती बहिण, जीला आपल्या जोडीदाराच्या सुखदुःखाची चिंता असते ती पत्नी. आई, बहिण, सहचारिणी, मैत्रीण या प्रत्येक भूमिकेचा आदर व्हायला हवा म्हणून ८ मार्च हा दिवस जगभर महिला दिन म्हणून साजरा केला जातो. उरण च्या महिलांना हा दिवस साजरा करता यावा म्हणून शनिवार दिनांक ८ मार्च रोजी डॉ नानासाहेब विष्णू धर्माधिकारी कन्या शाळेत उरण महिला संघाच्या वतीने महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. निता बालदी तर विशेष अतिथी सौ. सायली म्हात्रे या होत्या. त्याचबरोबर राणी म्हात्रे, संपुर्णा थळी,जान्हवी पंडित, स्नेहल कासारे, रजनी कोळी, आशा शेलार, दमयंती म्हात्रे, आदी मान्यवरांची मांदियाळी तसेच विविध सामाजिक संस्थेच्या महिला भगिनी उपस्थित होत्या. मांगल्य सांगणारे दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सानिका कदम यांनी केले. आलेल्या मान्यवरांनी महिलांना आपल्या भाषणातून प्रोत्साहित केले . त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. सहकार्याची भावना वाढीस लागण्यासाठी प्रेरीत केले व आज आपली स्त्री शक्ती ची झेप आकाशास गवसणी



घालत याबद्दल महिलांचे विशेष कौतुक केले. पुनम पाटेकर यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले.

विविध क्षेत्रातील गरुड झेप घेतलेल्या मुलींचा सन्मान करण्यात आला. यामध्ये आराध्या प्युरो(बुध्दिबळ पट्टू), परिधी घरत (जलतरण पट्टू),श्रध्दा निकम (स्केटींगमधे अव्वल) काव्या म्हात्रे ((मीस टीन नवी मुंबई)मुग्धा उभारे ( महेंद्र क्लब ज्युनियर कॅटेगरी प्रथम आणि इतर क्षेत्रात अव्वल) तसेच पत्रकार भगिनी संगिता पवार,दिप्ती पाटील, रणिता ठाकूर यांनाही गौरवण्यात आले.पोलीस खात्यातील पोलीस भगिनीं मानसी तांबोळी, रचना ठाकूर, प्रीती म्हात्रे यांनी सायबर क्राईम बद्दल माहिती दिली.

नादब्रह्म भक्तिगीत, सुर उरण करांचा देशभक्ती गीत, सी बर्ड स्पेशल स्कूल उरण चे नृत्य, जे. एच. के. झुम्बा,डिवाइन डान्स ग्रुप, अंबादेवी डान्स ग्रुप, युनीक ग्रुपस, फ्रेंड फॉरेवर ग्रुप, रिध्दी, सिध्दी महिला मंडळ, आदिशक्ती डान्स ग्रुप, जे. एच. के. कथ्थक ग्रुप, स्टार डान्स ग्रुप, क्रिस्टल कला ग्रुप या ग्रुपस ने धमाकेदार आपले नृत्यविष्कार सादर केले. त्याला प्रेक्षकांनाही टाळ्यांच्या कडकटाने प्रतिसाद दिला. असा हा भव्यदिव्य कार्यक्रम सुंदर रित्या , शिस्तबद्ध आणि जल्लोषात साजरा होण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजक होते, सानिका कदम, हेमा घरत, पुनम पाटेकर,आणि त्यांच्या सहकारी यांनी कार्यक्रमास चार चांद लावण्यासाठी विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे उरण चे आमदार महेश शेठ बालदी, कौशिक शहा, रजनी वारीक , गुरूछत्र क्लासेस च्या रचना ठाकूर, मिटकॉन कॉम्प्युटर सेंटर प्रसाद मांडलेकर, अंगण रिसॉर्ट च्या अनिता घरत, साधना ठाकूर यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. उरणमधील महिला कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करण्यासाठी, त्यांच्या कलेचा सन्मान होण्यासाठी या कार्यक्रमाचे उदिष्ट होय .अशा या कार्यक्रमास रंगत आणली ती गौरी मंत्री आणि दर्शना माळी यांच्या सुत्तसंचलनाने. या नंतर हेमा घरत यांच्या आभाराच्या शब्दसुमनांनी या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.

# कुरघोडी च्या राजकारणात पत्रकार महामंडळ बारगळले?

## तत्कालीन मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या बहिणीच्या आश्वासनाला केराची टोपली?

**दैनिक युवक आधार**
**दैनिक युवक आधार**

**एन्ट्रो*** : *ट्रिपल इंजिन सरकारमध्ये श्रेयवादाच्या लढाईत कोणीही जिंकावं;मात्र पत्रकारांच्या महामंडळ निर्णयाची हार होऊ नये इतकीच मागणी मीडिया असोशिएश ऑफ इंडिया (माई) पत्रकार संघटनेसह सोबत असलेल्या महाराष्ट्रातील सर्व संघटना आणि सच्चा पत्रकारांची आहे.*
*केवळ अधिकाऱ्यांच्या मर्जीने हे सरकार चालत असेल आणि तत्कालीन मुख्यमंत्री व वर्तमान उपमुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे यांच्या ड्रिम प्रोजेक्ट निर्णयाला अर्थसंकल्पात केराची टोपली दाखवली जात असेल तर , सरकारातील या तीन नेत्यांच्या निर्णयांना देखील हे अधिकारी कुठे - कुठे कात्री लावतील की तिघांच्या श्रेयवादात स्वतःचं चांगभलं करतील हाच मोठा संशोधनाचा विषय असेल!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संबंधित अधिकाऱ्यांवर करणार का कारवाई ?

**दि. १०, मुंबई प्रतिनिधी**

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या त्यातील एक महत्त्वाची आणि अनेक वर्षांची मागणी असणारे पत्रकार महामंडळ , ज्याच्यासाठी माई संघटनेच्या अध्यक्ष शीतलताई करदेकर यांनी १०व ११जुलै २०२४ रोजी आझाद मैदानावर आमरण उपोषण केलेले.
याची संवेदनशीलपणे दखल घेत ;पत्रकार कल्याणाकरिता, देशातील १ले पत्रकार महामंडळ करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मंत्री मंडळात या महामंडळाला मंजुरी दिली गेली होती.
आता ७ महिने उलटून गेलेत तरीही या अर्थसंकल्पात ना. एकनाथ शिंदे यांचा ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या, त्या पत्रकार महामंडळासाठी निधीच नसल्याने ना एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांच्या कल्याणासाठी निर्देशित व मंजुर केलेली ही योजना बारगळते की काय अशी दाट शंका निर्माण झाली आहे.
सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे ,या अर्थसंकल्पात अर्थ आणि वित्तमंत्री अजित पवार हे पत्रकारांसाठी जे महामंडळ आहे त्यासाठी निधी राखीव ठेवतील किंवा निधी घोषित करतील अशी अपेक्षा होती.मात्र तत्कालीन सरकारमध्ये मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांनी पत्रकार महामंडळासाठी जी घोषणा केली होती. त्या घोषणेसाठी या अर्थसंकल्पात निधीची तरतूद प्रस्ताव केलाच नसल्याने असणार नाही अशी माहिती मिळते.
यात नक्की पाचर कुणी मारली आहे याचा शोधही सुरु आहे. माहिती व जनसंपर्क विभाग मुख्यमंत्र्यांच्या तर कामगार मंत्रालय भाजपाच्या अखत्यारीतील !
तर विशेष दखलपात्र बाब अशी की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना माहिती जनसंपर्क चे प्रधान सचिव आय पि एस ब्रिजेश सिंह हे ( तत्कालीन उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांचे खासमखास) होते! महामंडळाचं घोडं कुणी अडवलं?की या विभागांत ताळमेळ समन्वय नव्हता की आणखीन काही, याची ७महिन्यांनंतर पडताळणी व चौकशी होण्याची आणि संबंधीतांवर कारवाई होण्याची गरज आहे. ज्या धडाक्याने मुख्यमंत्री वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि प्रत्येक मंत्र्यांच्या ओएसडी सचिव नियुक्ती त लक्ष घालून काम करत आहेत, तसेच या प्रकरणातील दोषींवर कारवाई करणार का? असा प्रश्न चर्चेत आहे. सध्या राज्यात महायुतीचा सरकार आहे; ट्रिपल इंजिन मधील प्रत्येक जण एकमेकांवर कुरघोडी करताना दिसतोय त्यामुळे जाणून-बुजून एकनाथ शिंदे यांनी मंजूर केलेल्या या महामंडळासाठी निधी व प्रस्ताव दिला गेली नसल्याची चर्चा सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे.

सचिन चिटणीस
**कार्याध्यक्ष**
**लक्ष्मीकांत घोणसे पाटील**
**सरचिटणीस**
**मीडिया असोसिएशन ऑफ इंडिया**

## महिला दिन निमित्ताने हळदीकुंकू व आदर्श होतकरू महिलांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

त्रिमूर्ती महिला मंडळ सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय जागतिक महिला दिन निमित्ताने हळदीकुंकू व आदर्श होतकरू महिलांचा सन्मान या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती माननीय श्री गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ सलील पाटकर व्याख्यान कॅन्सर ट्रीटमेंट सेंटर कार्यक्रम आयोजक सौ संगीताताई दिलीप आमले अध्यक्षा अनेक क्षेत्रातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आदर्श रीक्षेचालक आदर्श होतकरू महिला आदर्श कामगार महिला आदर्श डॉक्टर महिला आदर्श पोलीस महिला आदर्श धार्मिक महिला आदर्श सामाजिक महिला आदर्श राजकीय महिला आदर्श वक्त महिला आदर्श पत्रकार महिला आदर्श कवी महिला आदर्श ज्येष्ठ नागरिक महिला आदर्श गृहिणी असे अनेक सन्मानपूर्वक पुरस्कार देऊन त्रिमूर्ती महिला मंडळाच्या वतीने विशेष सन्मानपूर्वक पत्र देऊन सन्मान करण्यात आला या कार्यक्रमासाठी सौ संगीता आमले अध्यक्षा त्रिमूर्ती सामाजिक संस्था ,सौ दिपाली जाधव मोटार वाहन निरीक्षक ,सौ विशाखा ठाकरे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक ,सौ विद्या शिंदे साहेब मोटार वाहन निरीक्षक ,श्री देवकर श्री संतोष भगत संपादक रायगड पनवेल सौ संगिता दाते तसेच नवी मुंबई क्षेत्रातील 150 पेक्षा जास्त तसेच 51 आदर्श महिलाचा सन्मान करण्यात मा डॉक्टर सलील पाटकर यांनी महिलांना विशेष कॅन्सर या



आरोग्य विषयावरती व्याख्यान दिले मा गजानन गावंडे साहेब सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवी मुंबई यांनी सर्व महिलांचे कौतुक करून महिलांनी नियमित पुरुषाच्या बरोबरने काम केले याबद्दल कौतुक करून जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या एम एस सी बी च्या सहाय्यक अभियंता सौ सारिका अटष्नकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमांमध्ये महिलांना सुरक्षितते बाबत प्रश्न विचारून योग्य उत्तर देणाऱ्या महिलेस अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल च्यावतीने हेल्मेट बक्षीस देण्यात आले आहे कार्यक्रमाचे निवेदन तसेच आभार प्रदर्शन आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई सादरकर्ते व्यसनमुक्त जीवन काळाची गरज यांनी संपूर्ण कार्यक्रमांमध्ये विशिष्ट प्रकारे आभार प्रदर्शन करून सर्व महिलांची म्हणे जिंकली

## आ. भावनाताई गवळी यांचा जि.प.भर जहागीर जनसंवाद दौरा

### (जिल्हासंघटक अनिल गरकळ यांचा पुढाकार)

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर**
**रिसोड वार्ताहर**

ता.12 मार्च 2025/ भर जहागीर जिल्हा परीषद सर्कल अंतर्गत शिवसेना शिंदे गटाचे संघटन बांधणी,सदस्य नोंदणी,शाखा स्थापना,बुथ बांधणी आणि पक्ष प्रवेश कार्यक्रमा निमित्त आ.गवळी यांचा दौरा ता.13 मार्च पासुन जिल्हा संघटक अनिल गरकळ यांनी आयोजित केला आहे. विधान परीषद आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वात शिवसेना जिल्हा संघटक अनिल गरकळ यांनी भर जहागीर जिल्हा परीषद सर्कल अंतर्गत पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी ता.13 मार्च ते 19 मार्च दरम्यान भर जहागीर, मोरगव्हाण, वाडी,चाकोली,मोप,कन्हेरी, बोरखेडी,शेलुखड शे,पाचांबा,गणेश पुर,मांगवाडी या गावामध्ये संघटन बांधणी,सदस्य नोंदणी अभियान,बुथ बांधणी,आणि पक्ष प्रवेशाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या साठी शिवसेना शिंदे गटातील माजी.जि.प.सदस्य अनिल गरकळ,अमोल नरवाडे,शिवसेना ओबिसी तालुका अध्यक्ष रामेश्वर राऊत,कृषी सेना तालुका प्रभुख ज्ञानेश्वर भोसले,डॉ.उत्तमराव गि-हे,युवासेना उपतालुका प्रमुख शेषनारायण कोकाटे,डॉ.प्रल्हाद कोकाटे,अशोक नरवाडे,निवृत्ती कोकाटे,शंकर कोकाटे,प्रकाश चोपडे,तालुका उपप्रमुख नारायण खडशे,डॉ.विलास ठाकरे,जगन चोपडे,बळीराम चोपडे,रमेश चोपडे,परमेश्वर चोपडे,सिध्देश्वर सुर्यवंशी,शाम कोकाटे,मंगेश आघाव,परमेश्वर ढाकणे,रंगराव खडशे,संजय पारडे,याचा सहभाग राहणार आहे.



**ऑफीसः चेंबर क्र. ४१५, ए-विंग, ॲडव्होकेट्स चेंबर बिल्डींग, हायकोर्ट परिसर, छत्रपती संभाजीनगर मो.९३०९७४१५२३**

## जाहिर प्रगटन

(मौजे चित्तेगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील गट ६०/१ मधील क्षेत्र ४० आर बाबत.)

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे सविता महादेव सुरशे रा. पारडगाव, ता. जि. जालना, ह.मु.चितेगाव, ता. पैठण जि. औरंगाबाद यांनी श्रीकांत बळीराम नांगरे रा. फ्लॅट नं.ई-२/१, प्रताप नगर, कासलीवाल, विहार, शहानुरवाडी, छत्रपती संभाजीनगर, यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील मिळकत विकत घेण्याचा ईसारपावती करारनामा माझ्या पक्षकाराने त्यांच्याशी केलेला असून सदर मिळकत ही आजरोजी निर्विवाद व निदोंश असल्याचा भरवसा त्यांनी माझ्या पक्षकारास दिला आहे. सदरील मिळकतीचे विवरण व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
मौजे चित्तेगांव (श्रीकृष्णनगर), ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ग्रामपंचायत मिळकत नं. २७क्षेत्र ५५.७६ (२० x ३० फुट ६०० चौ. फुट) प्लॉट व त्यावरील दोन मजली बांधीव घर असुन सदरील मिळकतीची चतुः सिमा पुढील प्रमाणे.
पुर्वेस :१५ फुटाचा रस्ता.
**पश्चिमेस : मिळकत नं. २८**
**दक्षिण : २० फुटाचा रस्ता उत्तरेस : मिळकत नं. २९**
येणे प्रमाणे चतुःसिमा आहे. तरी सदर मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, तारण, गहाण, वारस, बक्षीस, लिज, दावा, विक्री, विक्रीकरार, जी.पी.ए., वित्तीय संस्था, बँका, हस्तांतरण व इतर मार्गाने हक्क व अधिकार पोहोचत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत माझ्या कार्यालयात लेखी स्वरुपात मुळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. मुदत संपल्यानंतर माझे पक्षकार सदरील मिळकतीचे रितसर खरेदीखत त्यांच्या हक्कात करुन घेतील, मुदतीनंतर आलेल्या उजर /आक्षेप हा माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. आक्षेप न आल्यास पुढील कार्यवाही पार पाडली जाईल यांची नोंद घावी. कोणाचेही आर्थिक व कायदेशीर नुकसान होऊ नये करीता हे जाहीर प्रगटन प्रकाशित केले.

**करीता हे जाहीर प्रगटन**
**दिनांक : १२.०३.२०२५**
**जाहीर प्रगटन देणार तर्फे**
**ॲड. सी. डी. राजपुत**

**ऑफीसः चेंबर क्र. ४१५, ए-विंग, ॲडव्होकेट्स चेंबर बिल्डींग, हायकोर्ट परिसर, छत्रपती संभाजीनगर मो. ९३०९७४१५२३**

# शिवनेरीत यशवंतराव चव्हान यांना अभिवादन ..

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूर अनंतपाळ**

: येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री ज्यांनी महाराष्ट्र एकसंघ ठेवून मुंबई महाराष्ट्रात कायम ठेवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका असून ते कुशल प्रशासक ,कवी यशवंतराव चव्हाण यांची जयंती त्यांच्या प्रतिमेचे पुजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरुण धालगडे , रासेयो चेकार्यक्रम अधिकारी प्रा डॉ पांडूरंग मुद्दे यांच्या हस्ते करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्यावर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ . डि .के धुमाळे यांनी प्रकाश टाकला . यावेळी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इंगळे सह प्राध्यापक व शिक्ष कोतर कर्मचारी रासेयो चे स्वंय सेवक विद्यार्थी यावेळी उपस्थीत होते .




# सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत विध्यार्थ्यांना मेंदूज्वर लस

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर भवानीनगर परिसरातील अंगणवाडी पासून नववी पर्यंतच्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर अंतर्गत १ते१५ वयोगटातील एकूण लाभार्थी 8180 असून दोन दिवसांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर अंतर्गत उपकेंद्र भवानीनगर व केंद्र सणसर येथे एक ते पंधरा वयोगटातील 2279 विध्यार्थी यांना जेई (जापनीज इन्सेफेलाइटिस) लस देण्यात आल. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज पाटील,डॉ.प्रतिक्षा देवकर आरोग्य सहाय्यक श्री अशोक कमळे आरोग्य सहाय्यक श्री ईराशा सोलापूर आरोग्य सहायिका श्रीमती मदने आरोग्य सेविका श्रीमती राशिनकर श्रीमती देवकाते श्रीमती राऊत श्रीमती कोकरे श्रीमती दुर्गाडे श्रीमती शिंदे आरोग्य सेवक श्री सतीश कांबळे श्री विकास कांबळे श्री हर्षद साबळे श्री उमेश गवळी श्री संतोष गोरे श्री संदीप दराडे श्री आदेश कोळेकर श्री रोहन तांदळे,रुग्णवाहिका वाहनचालक श्री काका निंबाळकर आणि माधुरी ठेंगल,सुवर्णा कांगळे,दीपाली कुंभार व सर्व आशाताई यांनी चांगले प्रकारचे लसीकरण सत्र पार पाडले



# केंद्रीय प्राथमिक शाळा भारज बुLL येथे महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद**

जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक

केंद्रीय प्राथमिक शाळा भारज बु LL येथे महिला दिन निमित्त महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावाच्या प्रथम नागरिक सरपंच सौ.शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ता श्रीमती शकुंतलाबाई गायकवाड ,सौ विजयाबाई गणेशराव देशमुख संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती जाफ्राबाद या हजर होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाबाई, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले व मान्यवराचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी महिलांच्या सन्मानार्थ विविध गीतावर नृत्य सादर केली. कार्यक्रम सुरु असतांनाच चालता बोलता प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली व विविध बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात महिलांचे विविध खेळ तळ्यात मळ्यात संगीत खुर्ची, गायन उखाणे तसेच महिला मार्गदर्शन असे भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले या कार्यक्रमात महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला व कार्यक्रमाचा आनंद घेतला.स्पर्धेत विजेत्या महिलांना बक्षीस वाटप करण्यात आले सदर मेळावा महिला मेळाव्यासाठी सखी सावित्री समिती माता-पालक संघ, सर्व महिला पालक सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या महिला शिक्षिका श्रीमती अनिता सोनटक्के व श्रीमती मीना इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच त्यांना शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती यांचे सहकार्य मिळाले.



# जगद्गुरु दयानंद पुरी स्वामींच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा१६मार्चला दारव्ह्यात होणार सत्कार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

जागतिक महिलादिनचे औचित्य साधून राज्यातील कोष्टी समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा रविवार दिनांक१६मार्च२०२५रोजी सकाळी११वाजता दारव्हा येथील निधी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.विशेष म्हणजे,जगद्गुरु श्री श्री दयानंद पुरी स्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य सोहळा होत आहे.सोहळ्याच्या निमित्ताने अलीकडेच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष सतीष दाभाडे यांनी दारव्हा येथे मेळावा संदर्भात आढावा घेतला.मेळाव्याच्या संदर्भाने सुरु असलेल्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले.या सोहळ्यामध्ये समाजातील कर्तृत्ववान महिलांचा स्वामीजींच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.यावेळी कोष्टी परिषदेचे अध्यक्ष अरुण वरोडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित रहाणार आहेत.या सोहळ्याच्या निमित्ताने विविध समित्यांचे गठण करण्यात आले आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विदर्भातील




कोष्टी समाज बांधव व भगिनींकडुन परिषदेला सहकार्य मिळत आहे.मेळाव्यापूर्वी सोहळ्याच्या ठिकाणी घेण्यात आलेल्या आढाव्याच्या वेळी समाजसेवक तथा परिषदेचे राष्ट्रीय महासचिव नारायणराव वड्डे,शोभा वड्डे,विदर्भ कार्याध्यक्ष विलास गोरख,विदर्भ संघटक नरेंद्र माहुरे,विदर्भ उपाध्यक्ष विलास भड,विभागीय पदाधिकारी किशोर सरोदे,नागपूर कोष्टी परिषदेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र जुमळे,परिषदेच्या महिला प्रतिनिधी सुनीता अलोणे,क्रिष्णराव पिंगे,स्वानंद देशकर,हर्षल अलोणे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी कोष्टी परिषदेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सुधीर अलोणे यांनी सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात येत असलेल्या नियोजनाची माहिती दिली.

# संत सेना महाराज जयंती साजरी मोठ्या उत्साहात साजरी...



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर कुं निकाळजे**
**वरूड / जाफ्राबाद**

जालना जिल्हातील जाफ्राबाद तालुक्यातील भारज बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ८ मार्च रोजी शनिवार संत सेना महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत सेना महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले

संत सेना महाराज हे एक वारकरी संप्रदायातील संत असून त्यांना ज्ञानदेव नामदेवांच्या परिवारातील सदस्य म्हणून मानले जात होते

त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील बांधवगड मध्ये झालेला आहे

संत सेना महाराज हे नाभिक समाजाचे होते ज्ञानेश्वर तुकाराम महाराज इतकेच संत सेना महाराजांना श्रेष्ठ मानले जात होते

यावेळी उपस्थित सरपंच सौ, शकुंतलाबाई रामचंद्र तेलंग्रे यांचे सुपुत्र शरद तेलंग्रे, ग्रामसेवक सी आय पठाण, उपसरपंच, रहीम टेलर, घरकुल विभाग जाफ्राबाद,कर्मचारी योगेश्वर देवडे, सर, रोजगार सेवक, एम डी गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य, समाधान दामधर, समितीचे सदस्य, विजय देशमुख, राजेंद्र गायकवाड, ज्ञानेश्वर पेंटर, संजय शिंदे, ब्रह्मा शिंदे, महेश शिंदे, सुरेश वखरे, ज्ञानेश्वर झगरे, श्याम वैद्य, गणेश वैद्य, वैभव शिंदे, कृष्णा शिंदे, संतोष राऊत, सतीश झगरे आदी नाभिक समाज व गावकरी मंडळी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलोरा ग्रामपंचायतीची जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना अडगळीत

### जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना पूर्ण करा गटविकास अधिकारी यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

**घाटंजी** : पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या मौजा बेलोरा येथे जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नळ व पानीपुरवठा योजनेचे काम सन २०२१/२२ मध्ये मंजूर होते त्यानुसार पानीपुरवठा योजनेचे काम सुरू करण्यात आले. त्यामध्ये नळ पानीपुरवठा विहीर व गावाअंतर्गत पाईप लाईन करण्यात आली त्यानंतर नळ पानीपुरवठा योजनेचे कुठलेही काम करण्यात आले नाही. पाण्याची टाकी गावातील वितरण प्रणाली इ. कामे अजूनही अडगळीत आहे. मागील गेल्या २ वर्षापासून काम बंद आहे संबंधित कामाच्या कंत्राटदार कडून तसेच संबंधित पानी पुरवठा विभागाला सुद्धा पत्र व्यवहार केलेला आहे त्याचे कडून समाधान कारक उत्तर मिळाले नाही पाणी पुरवठा योजनेअंतर्गत गावातील ग्रामस्थ वारंवार विचारणा करतात परंतु ग्रा. पं ला सुद्धा काही सांगता येत नाही त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाला ग्रामस्थाच्या रोषाला बळी पडाव लागते. ग्रामस्थ ग्राम सभेच्या वेळी पाणीपुरवठा योजने संदर्भात प्रश्न उपस्थित करतात त्यामुळे ग्रा पं पदाधिकारी व ग्रामस्थामध्ये वाद निर्माण होतात. सध्या पाणीटंचाई चा विचार करता पानी पुरवठा योजनेचे काम लवकर सुरू होणे अपेक्षित आहे त्यामुळे गावातील नळ



पाणी पुरवठा योजनेचे काम लवकर सुरू करण्यात यावे अन्यथा ग्रामस्थाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी सदर पानीपुरवठा योजने संदर्भात ताबडतोब निर्णय घेण्यात यावा अन्यथा पुढील ७ दिवास मध्ये कंत्राटदाराने उर्वरित काम चालू न केल्यास ग्रामस्थ उपोषणास बसणार त्या पुढील संपूर्ण जवाबदारी संबंधित विभागाची राहील असे निवेदन गटविकास अधिकारी गजानन पिल्लेवाड यांना देण्यात आले. या निवेदनाच्या प्रतिलिपीत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि प यवतमाळ, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग पांडरकवडा, आमदार राजुभाऊ तोडसाम यांना पाठविण्यात आला. यावेळी सरपंच वंदना नगराळे, उपसरपंच मुजम्मील पटेल, प्रवीण बुर्रेवार, ईश्वर बावणे, दत्तात्रय डंभारे, रामदास पेटेवार सह अन्य उपस्थित होते.

# कोमसाप जिल्हा कार्यकारिणीची बैठक उत्साहात संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/**
**एम.डी.भोईर**



अलिबाग राही या भव्य विश्राम गृहात कोकण मराठी साहित्य परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.या बैठकीचे सूत्रसंचालन रवींद्र थळे यांनी केले. या बैठकीला जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ,केंद्रीय जनसंपर्क प्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील,जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी,सचिव सुजाता पाटील, मा.दक्षिण विभाग अध्यक्ष संजय गुंजाळ,जि.समन्वयक अ.वि. जंगम,रेखा कोरे ,जिल्ह्यातील शाखांचे अध्यक्ष, प्रतिनिधी आणि सदस्य उपस्थित होते. वैशाली भिडे यांनी ईशस्तवन केले .सुजाता पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात बैठकीची भूमिका मांडली. मार्गदर्शन करतांना रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील म्हणाले, जिल्ह्यातील शाखांच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी आपल्याला स्वतःला केंद्रस्थानी मानता खेड्यातील दूरवर असलेल्या कविलेखकाला केंद्रस्थानी मानून त्याची साहित्य प्रेरणा विचारात घेऊन काम करावे. नवोदितांच्या नव्या लेखकांना उत्तेजीत करावे. उत्कृष्ट शाखा किंवा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देताना अभ्यासपूर्ण पद्धतीने करू या.तसेच जिल्ह्यातील र.वा. दिघे शं.बा. सावंत,शशिकला मेहता, ललिता बांठिया, वासंती ठाकूर, गजानन बागडे या दिवंगत साहित्यिकांचे शाखांमध्ये स्मृती कार्यक्रम करू या.कार्यक्रमात वैविध्य आणण्यासाठी पोपटी कविसंमेलन, विविध कार्यशाळा घेणा-या शाखांचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात सुधीर शेठ म्हणाले की, शाखांचे हिशोब १५ दिवसांत व्हावेत, शाखांचे कार्यक्रम एकमेकांना विचारून घ्यावेत, व्यवहारात पारदर्शकता असावी,निवेदकांस कार्यशाळा, इत्यादी विषयांवर विवेचन केले. अन्य चर्चेत पुरुषोत्तम मुळे , अ.वि.जंगम,संजय गुंजाळ, विजय घोसाळकर, नरेंद्र हर्डीकर, काशिनाथ जाधव, रमेश धनावडे, मच्छिंद्र म्हात्रे, गोपाळ शेळके, सिध्देश लखमदे,सुखद राणे, फुलगावकर म्यडम, माधुरी थळकर,हेमंत बारटक्के इत्यादींनी चर्चेत भाग घेतला. गणेश कोळी यांनी श्री सौ सुजाता प्रसाद पाटील यांच्यासह सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# रेडबुल कंपनीचे एनर्जी ड्रिंक चोरणाऱ्यांकडून 9,89,400 रुपयांचा मुद्देमाल जप्त बीड येथील दोन आरोपी ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी प्रमुख**
**राजू शिंदे :-**

जालंना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातुन अज्ञात चोरट्याने दुकानाच्या शटरची लॉकची पट्टी कट करुन चारचाकी वाहनामध्ये रेडबुल कंपनीच्या एनर्जी ड्रिंकचे बॉक्स चोरुन नेल्याने पोस्टे मंठा जि. जालना. गुरनं 31/2025 कलम 334(1), 305 (A) भा.न्या. सं. गुन्हा दाखल झाला होता. त्याअनुषंगाने तांत्रीक माहितीच्या आधारे आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाल्याने बीड येथील 1) शेख सोहेल शेख कमरोहीन, वय 25 वर्ष, राहणार ख्वाजा नगर,



मोमीनपुर पेठ बीड, जि. बीड. 2) अमीन शमीम शेख, वय 30 वर्ष, राहणार अहमद मस्जीद, मोमीनपुर, पेठ बीड, जि. बीड. यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्या करतांना वापरण्यात आलेल्या मारुती सुझुकी कंपनीची एक अर्टिका कार व एक स्विफ्ट डिझायर कार, तसेच गुन्ह्यातील गेला माल (रेडबुल कंपनीचे एनर्जी ड्रिंक) असा एकुण 9,89,400/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस

### (स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही)

अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोलीस ठाणे मंठाचे पोलीस निरीक्षक श्री रविंद्र निकाळजे, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ सोबत स्थागुशाचे अमंलदार रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशीक, कैलास खार्डे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, ईरशाद पटेल, किशोर पुंगळे व पोलीस ठाणे मंठाचे विठ्ठल मेखले, मंगेश चौरे यांनी केली आहे.

# निफाड भूमी अभिलेख लाच प्रकरणातील मुख्य सुत्रधार भूमि अभिलेख अधिकारी भाबड यांच्यासह शिपाई यांना निलंबित करुन त्यांची संपत्ती जप्त करावी

**छत्रपती युवा सेना संघटनेची मागणी**
**जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन**
**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**



निफाड भूमिअभिलेख कार्यालयात शिपाई मार्फत लाच मागणाऱ्या मुख्यसूत्रधार उपधिक्षक श्री. भाबड यांना त्वरित निलंबित करण्याची कार्यवाही करावी तसेच शिपाई श्री नितेंद्र गाडे व उपधिक्षक श्री भाबड यांची उच्चस्तरीय चौकशी करावी तसेच त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी. अशी मागणी आज छत्रपती युवा सेनेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी यांना करण्यात आली भुमी अभिलेख अधिकारी भाबड यांच्यावर कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले जाईल याची असा इशाराही छत्रपती युवा सेनेच्या वतीने देण्यात आला यावेळी छत्रपती युवा सेना प्रदेश सरचिटणीस निकेश पाटिल, प्रदेश प्रवक्ते यशजी बच्छाव, नाशिक जिल्हाध्यक्ष किशोर भाऊ वडजे, महानगर प्रमुख मंगेश कापसे,शिक्षक आघाडी प्रमुख राहुल पगारे सर यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते.

# कुरआन ए पाक मधील संदेश

पवित्र रमजान महिन्याचा दुसरा भाग जो दहा दिवसांवर आधारित आहे याला मगफिरत म्हणजे माफीचा अशरा म्हणतात.(अशरा म्हणजे दहा दिवसांचा कालावधी) या दहा दिवसांमध्ये अल्लाहतआला आपल्या लाखो भक्तांना माफी देत असतो. या दुनियेतील प्रत्येक जण हा कोणत्या ना कोणत्या प्रकारचे अपराध करीत असतो. अपराध किंवा गुन्हे फार मोठे दुष्कृत्ये केल्यानेच होतात असे नव्हे. विनाकारण एखाद्याचे मन दुखावणे हा सुद्धा अपराध आहे. जाणून-बुजून कुणाची तरी निंदानालस्ती करणे हा देखील अपराध आहे. कोणतेही कारण नसताना केवळ दुसऱ्याला नाव ठेवणे हा सुद्धा अपराध आहे. एखाद्याकडे तिरस्काराने पाहणे हा सुद्धा अपराध आहे. स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी एखाद्याला चुकीचे मार्गदर्शन करणे हा देखील अपराध आहे. असे छोटे-मोठे अनेक अपराध मानवी जीवनात सातत्याने घडत असतात.या सर्व अपराधांपासून सुटका मिळविण्यासाठीच धार्मिक सोपस्कार केले जातात.प्रत्येक धर्मामध्ये धार्मिक कर्मकांड करताना काही तरी आधार घेतलेला दिसून येतो.धार्मिक कार्यक्रम केल्याने मानसिक स्वास्थ्य प्राप्त होते अशी एक सर्वसाधारण धारणा आहे.प्रत्येक धर्माने धार्मिक ग्रंथ वाचन करण्याची शिकवण दिली आहे. कुरआन पठण म्हणजे तिलावत करणे हे सुद्धा रमजान महिन्यातील एक पवित्र कार्य किंवा इबादत (प्रार्थना) समजली जाते. आपल्याकडे जसे भागवत कथा,नवनाथ पारायण,पोथी वाचन, ज्ञानेश्वरी पारायण केले जाते. त्याचप्रकारे रमजान महिन्यांमध्ये जगभरामध्ये




कुरआनशरीफची तिलावत ही केली जाते. सर्व प्रकारच्या पोथ्या वाचनाचा हेतू परमार्थ चिंतन साधून अल्लाह, ईश्वर,भगवंताची आराधना करणे हाच असतो. विश्वनिर्मात्याने ही सृष्टी मानवता (इन्सानियत) धर्मासाठी निर्माण केली. पण मानवाने या मानवतेची विभागणी वेगवेगळे धर्म,जाती,पंथ यामध्ये करून जगभरामध्ये सवते सुबे निर्माण केले. हिंदू-मुस्लीम,इसाई, ज्यू,शीख,बौध्द,जैन असे अनेक धर्म निर्माण झाले.प्रत्येकाने आपल्या पद्धती आपल्या विचारानुसार विकसित केल्या.परंतु या सर्वांमध्ये एक समान धागा म्हणजे कोणत्याही धर्माने इतर धर्मांचा तिरस्कार केला नाही.युरोपमध्ये अनेक ठिकाणी हजरत पैगंबरांनी सांगितलेले कोट्स होर्डिंग रूपाने आजही रस्त्यावर झळकताना दिसतात. ज्या देशांनी चांगले विचार आत्मसात केले ते फार पुढे गेले.पण ज्यांनी अशा विचारांचा स्वीकार केला नाही ते प्रगतीपासून वंचित राहिले असे जगाचा इतिहास सांगतो. आपला देशही त्याला अपवाद नाही. भारताच्या राज्यघटनेमध्ये सर्वधर्मसमभावाचा पुरस्कार केला गेला आहे.मात्र राजकीय परिस्थितीमुळे या तत्वांना तिलांजली देण्यासाठी सुद्धा प्रयत्न होताना दिसत आहेत. आपल्या देशासाठी हे प्रगतीचे लक्षण नाही. कुरआनची शिकवण ही सर्वांसाठी आहे. मानवाच्या विकासासाठी काय केले पाहिजे याचे विश्लेषण त्यामध्ये अल्लाहतआलाने केलेले आहे.गत साडेचौदाशे वर्षाच्या इतिहासामध्ये घडलेल्या अनेक घटनांचा संबंध कुरआनमधील शिकवणीशी संबंधित आहे.म्हणूनच जगभरामध्ये साडेआठ लाखांपेक्षा जास्त वेबसाईटवर कुरआन सर्च केला जातोय. पाश्चिमात्य राष्ट्रे त्यातील सत्य व योग्य गुणांचा स्वीकार करीत आहेत. मानवी कल्याणासाठी सांगितलेल्या कुरआनमधील आदेशांचे पालन होत आहे. आपला ही देश सुजलाम सुफलाम होण्यासाठी कुरआनचा पैगाम ( संदेश) समजून घेणे आवश्यक आहे. (क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082**

# सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य आयोजित "मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा" राज्यस्तरीय सन्मान सोहळा

**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख**

सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य आयोजित "मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा" राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२५ विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करण्याऱ्या व्यक्तीला दरवर्षी दिला जातो. आत्मविश्वासाने आणि जिद्दीनेआपले ध्येय साध्य करीत आहात. आपल्या कार्यक्षेत्रामध्ये खंबीरपणे उतुंग कामगिरी करून समाजाचे कल्याण करण्यासाठी सतत धडपड करत नेहमी आपल्या विकास कामाच्या आणि समाजासाठी केलेल्या योगदानाची दखल घेत आपल्या कार्याने ओळखले जाणारे बिरसा मुंडा क्रांति दलाचे जिल्हाध्यक्ष लोणार कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भगवानराव आश्रु कोकाटे यांना प्रदान करण्यात आला. भगवानराव यांनी आपल्या राजकिय कारकिर्दीत आपल्या गावासाठी,आपल्या जिल्हा परिषद सर्कलसाठी विविध क्षेत्रातात आपल्या परिसराचा नाव उंचवण्यासाठी नेहमी प्रयत्न केले.जि.प.शाळेला,ग्राम पंचायतला आपल्या कामाची पावती म्हणून विविध स्तरांतून पुरस्कार मिळून दिले. जि.प. बुलढाणा सन २००६ ते २००७ ला संत गाडगे बाबा स्वच्छता पुरस्कार ,उपवनसंरक्षण विभाग बुलढाणा सन २००७ ते २००८ मध्ये संत तुकाराम वनग्राम जिल्हास्तरीय १ले बक्षिस २५००० हजार रुपये देउन सत्कार करण्यात आला. आदिवासी मस्त्यमार संस्थेला आदर्श मत्स्य व्यवसाय पुरस्कार देउन २५००० हजार रूपये देउन सत्कार करण्यात आले. सन २००८ ते २००९ देण्यांत आला.जिल्हा परिषद बुलढाणा यांनी लोणार तालुक्यातील पहिले आर आर आबा सुन्दर ग्राम पुरस्कार प्रदान करुन टिटवी ग्रामपंचायत यांना दहा लाख रुपये देऊन पुरस्कार देण्यात आला. जि.प. केंद्रीय शाळा टिटवी २४ जानेवारी २०१९ ला प्रथम तालुक्यातील ISO मानांकन प्राप्त ८ मार्च २०१९ आंतरराष्ट्रीय शाळेचा दर्जा (ओजस) प्राप्त, ५ मार्च २०२१ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना मानांकन, सन २०२० ते २०२१ ला महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभाग आदिवासी मंत्री विजयकुमार गावीत,आयुक्त नयना गुंठे यांनी आदिवासी सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२१ ते २०२२ ला गहू व सन २०२२ ते २०२३ ला हरभरा या पिकाचे नियोजन करण्यात आले व भरघोस उत्पन्न घेऊन अमरावती महसूल विभागातून आदिवासी मधून पहिले बक्षीस घेण्यात आले तत्कालीन कॅबिनेट मंत्री माननीय राजेंद्र शिंगणे व खासदार प्रताप जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.आदिवासी संघर्ष परिषद महाराष्ट्र यवतमाळ यांनी पुरस्कार प्रदान करण्यात आला २३ एप्रिल २०२३




ला सरपंच सेवासंघ महाराष्ट्रच्या वतीने आदर्श सरपंच टिटवी पुरस्काराने सन्मानित गौरविण्यात आले.आणि याच कामाची दखल घेत सरपंच सेवा संघाचे संस्थापक यादवराव पावसे सह अमोल शेवाळे राजेंद्र गिरी,रविंद्र पवार,दिनेश उघडे,रोहित पवार,बाबासाहेब पावसे यांच्या कडून सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य "मान कर्तृत्वाचा.. सन्मान नेतृत्वाचा" राज्यस्तरीय पुरस्काराने भगवानराव कोकाटे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी कारभारी सानप संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार,उत्तमराव सानप सरपंच पती नांद्रा,पीनू तनपूरे उपसरपंच नांद्रा,परसराम कोकाटे, दामोधर तनपुरे ग्रामपचायात सदस्य,एम.ए. नसीम सर राशन दुकानदार,पंढरी कोकाटे, संतोष पूनवे ,प्रकाश राऊत, प्रभाकर तानपुरे , सोना राऊत आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभाग कंत्राटदाराच्या दावणीला ?

### पाटापांगरा मठ सिमेंट रोड प्रकरण
### बोगस कामाकडे शाखा अभियंत्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?
### मठ ट्रस्ट ने दिलेली तक्रार धूळ खात?
### तक्रार देऊन तपास न करण्याचे कारण काय?

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

घाटंजी:– तालुक्यातील पाटापांगरा येथून काही अंतरावर असलेल्या बालयोगी संत गुणवंत महाराज यांचे मठ असून येथे काही दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सिमेंट रोड करण्यात आले मात्र लावण्यात आलेल्या बोर्डवरून काम अर्धवट झालेच परंतु रोडची क्वालिटी ही बोगस आहे.

याबाबत मठाच्या ट्रस्टने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी तक्रार देऊन ही बरेच दिवस झाले असून कोणत्याही प्रकारची साधी चौकशी करण्याची तसदी शाखा अभियंत्याने घेतली नाही. चौकशी न झाल्यास ट्रस्ट सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदाराच्या विरोधात आमरण उपोषणाला बसण्याच्या तयारीत. शासकीय बांधकामात गैरव्यवहार व भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येतात. त्यात कामाचा दर्जा हा कळीचा मुद्दा असतो. यावर नियंत्रण असावे व शासकीय कामे दर्जेदार असावी, यासाठी शासनाने क्वॉलिटी कंट्रोल अर्थात गुणनियंत्रक मंडळाची स्थापना केली. हे मंडळ असताना सुध्दा बहुतांश कामाचा दर्जा मात्र निकृष्टच असतो. शासनाच्या विविध खात्यात या क्वॉलिटी कंट्रोलच्या प्रयोगशाळा आहे. पण, त्यांचे अधिकारही मर्यादित असल्यामुळे या कामाचा दर्जा राखला जात नाही हे दुर्दैव आहे. जिथे कामाचा दर्जा नसेल तर तत्काळ चौकशी करून कारवाई करणे गरजेचे आहे. मात्र प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम उपविभाग घाटंजी शाखा अभियंता याला अपवाद ठरत आहे.

# श्री.आनंद नांदगावकर सर यांची मुख्याध्यापक पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**



श्रीमती सरस्वतीबाई भाले पाटील विद्यालय ,मानवत येथे शिक्षक पदी कार्यरत असलेले श्री.आनंद नांदगावकर सर यांची मुख्याध्यापक पदी निवड झाली असून संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री. मुंजाजी भाले पाटील यांनी यथोचित सत्कार करून पदोन्नती मिळाल्या बद्दल नांदगावकर सरांचे अभिनंदन केले.

सुंदर हस्ताक्षर कला आनंदाक्षर नावाने सर्वदूर प्रसिद्ध,अलौकिक वक्तृत्व कौशल्य ,चित्रकला, रांगोळी आणि भित्तिचित्रे यामध्ये कौशल्य प्राप्त असून सुद्धा स्वभावाने शांत,संयमी आणि नम्र स्वभाव हे सरांचे विशेषत्व आहे.श्री आनंद सरांना पदोन्नती बद्दल हार्दिक शुभेच्छा.

# शिक्षकप्रेमी नागरीक दादासाहेब घोडके यांनी जि. प. पारोडीच्या शाळेतील विद्यार्थ्यांना केल्या मोफत टोप्या वाटप

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा प्रतिनिधी**

आष्टी तालुका पारोडी येथे जि.प. पारोडी शाळा ईयत्ता १ली ते ४ थी पर्यत असुन शाळेला लागगनच अंगणवाडीत २५ ते ३० विद्यार्थी आहेत. सध्या उन्हाळा चालु झाल असुन उष्णता वाढत चालली आहे. उन्हाची दाहकता प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे.जि.प. प्रा शाळेतील मुले दुपारी शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांना घरी जाताना उन्हाचा त्रास होतो. या गोष्टीची दक्षता घेऊन पारोडी गावातील शिक्षण प्रेमी नागरिक श्री. दादासाहेब घोडके यांनी शाळेतील तसेच अंगणवाडीतील सर्व विद्यार्थ्यांना स्वखर्चातून टोप्यांचे वाटप केले. रंगीबेरंगी टोप्या परिधान केल्यानंतर विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला. या प्रसंगी सरपंच श्री बंकट ( तात्या ) परकाळे, उपसरपंच श्री दिपक गलांडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री नागेश सायंबर उपाध्यक्ष श्रीम सारीकाताई सायंबर शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल शिंदे सर सहशिक्षक श्री. कृष्णा ढगे सर श्री नामदेव सायंबर श्री परकाळे श्रीमती. आरतीताई सायंबर कुसुमताई काळे, , मोनिकाताई सायंबर आदी लोक बहुसंख्येने उपस्थित होते.
मोफत टोप्या वाटप केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री विठ्ठल शिंदे सर यांनी श्री दादासाहेब घोडके यांचे आभार व्यक्त केले.



# महावितरण थकबाकीत जळगाव जिल्हा अग्रेसर


## जळगाव परिमंडळाची ९७६ कोटींची थकबाकी

**विजय पाठक/जळगाव**

महावितरणच्या जळगाव परिमंडळाची थकबाकी ही ९७६ कोटी असून ही थकबाकी वसूल करण्याचे आव्हान महावितरण पुढे आहे. विशेष म्हणजे शासकीय कार्यालये, सार्वजनिक पाणीपुरवठा, दिवाबत्ती यांचीच मोठ्या प्रमाणावर थकबाकी असल्याने महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यात सर्वाधिक थकबाकी ही जळगाव जिल्ह्याची असून ती ४७९ कोटी ५३ लाख रु. आहे.

या तीनही जिल्ह्यातील ४८९९ शासकीय कार्यालयांच्या इमारतींचे वीजबिल थकबाकी ही ७ कोटी ७८ लाख आहे. घरघुती ग्राहकांचा विचार केल्यास या तीन जिल्ह्यातील ३ लाख ४४ हजार ९२४ ग्राहकांची थकबाकी ही ५० कोटी पाच लाख रु. आहे. तर २२९५ वाणिज्य ग्राहकांची वीज थकबाकी ही १० कोटी ७३ लाख आहे. औद्योगिक ग्राहकांचा विचार केल्यास ही थकबाकी ७ कोटी ३३ लाख रु. असून इतर ग्राहकांची थकबाकी २८ लाख रुपये आहे.

अशारितीने या तीनही जिल्ह्यातून महावितरणला ९७८ कोटी रुपयांची वसुली करण्याचे कडवे आव्हान आहे. ही थकबाकी मोठ्या प्रमाणावर असल्याने ही वसुली पूर्ण क्षमतेने ग्राहकांकडून करण्याच्या सूचना परिमंडळातील कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याचे महावितरणमार्फत सांगण्यात येत आहे.




### जळगाव परिमंडळात तीन जिल्ह्यांचा समावेश

महावितरणच्या जळगाव परिमंडळात जळगाव, धुळे, नंदुरबार हे जिल्हे येतात. या तीनही जिल्ह्यांची वीजबिलाची थकबाकी ही ९७६ कोटी ८२ लाख रुपये असून यात जळगाव जिल्ह्याची थकबाकी सर्वाधिक असून ती ४७९ कोटी ५३ लाख आहे. धुळे जिल्ह्याची थकबाकी ही २८२ कोटी ०३ लाख रु. आहे तर नंदुरबार जिल्ह्याची थकबाकी ही २१५ कोटी २६ लाख रु. आहे.

# कशेडी घाटातील भुयारी मार्ग खुला

## मुंबईकडील भुयारावर तिरंगा तर कोकणाकडे वारली चित्रकला



**पोलादपूर :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर आणि खेडदरम्यानच्या कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गपैकी दुसरा भुयारी मार्ग शिमगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. या भुयाराला तिरंगा आणि वारली चित्रकलेने सजविण्यात आल्याने पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी भुयार भेटीदरम्यान महावितरणसोबत संपर्कात राहण्याचे निर्देश भुयाराच्या कामाच्या ठेकेदार कंपनी एसडीपीएलला दिले होते. मात्र, आजतागायत महावितरणकडून विद्युतप्रवाह सुरू न झाल्याने विद्युत प्रकाशझोत आणि व्हेंटिलेशनचे पंखे बंदच आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील धोकादायक कशेडीतील दोन्ही भुयारी मार्ग सोमवारी सायंकाळपासून वाहतुकीसाठी खुले झाल्याने चाकरमान्यांना शिमगोत्सवात नवीन भुयारी मार्गातून एकेरी वाहतुकीसाठी सुसाट प्रवास करता येणार आहे. विद्युतपुरवठा खंडित झाल्यास वाहतूक व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, याकरिता तात्पुरत्या स्वरूपात जनरेटरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून कायमस्वरूपी वीज पुरवठ्यासाठी अनामत रक्कम भरण्याची प्रक्रिया देखील अंतिम टप्यात असल्याचे एसडीपीएल कंपनीकडून सांगण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून पळस्पे ते कशेडी घाटातील भुयारी मार्गापर्यंतचा दौरा केल्यानंतर भुयारी मार्गातील विद्युत प्रकाशघोत आणि वायू विजनासाठी विद्युतप्रवाह सुरू करण्यासाठी महावितरणच्या संपर्कात ठेकेदार कंपनीने राहण्याचे सुचविले होते. मात्र, भुयारी मार्गातील विद्युतप्रवाह सुरू न झाल्याने जनरेटरचा वापर काही दिवस करण्याची व्यवस्था करून तातडीने शिमगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या भुयारातून कोकणाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी प्रवास वेगवान करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

पोलादपूर ते खेड दीड तासाचे अंतर पार करण्यासाठी यापूर्वी कशेडी घाटातील वळणा वळणाच्या घाट मार्गामुळे ४५ मिनिटांचा कालावधी लागत असे. मात्र, भुयारी मार्गामुळे फक्त १० मिनिटात पार करता येत असल्याने अनेक एसटी बसेस, खासगी कार, ट्रक, कंटेनर, ट्रॅव्हल्सच्या बसेस, लहान वाहने भुयारी मार्गाने जात आहेत. कोकणाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकारक होणार असल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

### राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत जनरेटरची सुविधा

दोन्ही भुयारी मार्गात कायमस्वरूपी वीजपुरवठ्यासाठी राष्ट्रीय महामार्ग खात्याने महावितरणकडे ११ के.व्ही. क्षमतेच्या विजेची मागणी केली असता त्यापोटी ८० लाख रुपयांचे डिपॉझिट भरणा करण्याबाबत कोटेशन दिले होते. अनामत रक्कम भरण्याची प्रक्रिया लांबणीवर पडल्याने शिमगोत्सवात दोन्ही भुयारी मार्ग वाहतुकीसाठी खुले होण्याबाबत साशंकता व्यक्त होत असताना राष्ट्रीय महामार्ग विभागाने दोन्ही भुयारीमार्गात जनरेटरची सुविधा उपलब्ध करून दिली.

# नांदेडला सुपर स्पेशालिटी रुग्णालय व्हावे

### खा. अशोक चव्हाणांची जे.पी. नड्डांकडे मागणी



**नांदेड :** राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेऊन विष्णुपुरीस्थित डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ब्लॉक, ट्रॉमा केअर सेंटर आणि बर्न इंज्युरीज (लेव्हल-२) च्या उपचार सुविधा उभारण्याची मागणी केली आहे.

नवी दिल्लीत झालेल्या या भेटीमध्ये खा. अशोक चव्हाण यांनी डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध सुविधांची विस्तृत माहिती देत येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल स्थापन करण्याची आवश्यकता विषद केली. ते म्हणाले की, या वैद्यकीय महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी दरवर्षी १५० तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०७ विद्यार्थी प्रवेश घेतात. या संस्थेत ५० जागांच्या प्रवेश क्षमतेसह बी.एससी. नर्सिंग आणि इतर पॅरामेडिकल अभ्यासक्रम देखील चालवले जातात.

येथील रुग्णालयात आयसीयू, एसआयसीयू, एमआयसीयू, एनआयसीयू, पीआयसीयू आणि सुसज्ज लेबर रूमसह १ हजार ८० खाटा आहेत. याशिवाय येथे १५ मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर, प्रगत अपघात सेवा आणि मेट्रो रक्तपेढीसह इतर विविध वैद्यकीय सेवा उपलब्ध आहेत. महात्मा फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत आणि इतर सरकारी आरोग्य योजना येथे प्रभावीपणे राबविल्या जातात.

जगप्रसिद्ध गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर साहिब नांदेडमध्येच असून, हे शिखांचे १० वे गुरु श्री गुरु गोबिंदसिंघजी यांचे अंतिम विश्रांतीस्थळ आहे. भारतभरातून आणि विदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक या पवित्र स्थळाला भेट देतात.

# वनमंत्री गणेश नाईक यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र ; 'ती' १४ गावे नवी मुंबईत नकोतच

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण मतदारसंघातील शीळ–तळोजा मार्गालगतची १४ गावे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट करण्याच्या निर्णयाला वनमंत्री गणेश नाईक यांनी विरोध केला आहे.त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत पत्र पाठविले असून यामुळे ठाणे जिल्ह्यातील गणेश नाईक विरुद्ध एकनाथ शिंदे संघर्ष पुन्हा प्रकर्षाने समोर आला आहे. १४ गावांच्या समावेशामुळे नवी मुंबई महापालिकेवर सहा हजार कोटी रुपयांच्या आर्थिक भार पडणार असल्याचे नाईक यांचे म्हणणे आहे. एकेकाळी वाढीव मालमत्ता कराच्या प्रश्नावर नवी मुंबई महापालिकेतून बाहेर पडल्याने ही गावे समस्यांच्या गर्तेतत सापडली आहेत. यातून बोध घेऊन ग्रामस्थांनी आमच्या गावांचा पुन्हा नवी मुंबई महापालिकेत समावेश करावा अशी मागणी लावून धरली होती. लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापुर्वी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन निर्णय काढून ही मागणी पुर्ण केली. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आग्राहामुळेच हा निर्णय घेतला गेल्याची चर्चा तेव्हा रंगली होती. या पार्श्वभूमीवर ठाणे–कल्याण वेशीवरील १४ गावे नवी मुंबई महापालिका हद्दीतून वगळावित असे पत्र वनमंत्री गणेश नाईक यांनी मुख्यमंत्र्यांना दिल्याने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या गावांच्या विकासाचा भार नवी मुंबईकर करदात्यांनी का सोसावा, असा सवाल पत्रात करण्यात आला आहे. नवी मुंबई महापालिका हद्दीत समावेश करण्यात आलेल्या १४ गावे वगळावीत यासंबंधीचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. मी स्वतः त्यांची भेट घेऊन हा विषय मांडणार आहे. या गावांवर होणाऱ्या खर्चाचा भार नवी मुंबईकरावर लादण्यात येऊ नये, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. – गणेश नाईक, वनमंत्री

# निफाड नगरपंचायत थकीत घरपट्टी पाणीपट्टी न भरल्यास पाणीपुरवठा खंडित होणार

### नगरपंचायत ची थकीत घरपट्टी पाणीपट्टी दिड कोटी च्या घरात

**दैनिक युवक आधार.**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**



निफाड नगरपंचायत हद्दीतील थकीत घरपट्टी व पाणीपट्टी धारकांना वारंवार कर भरणे बाबत जाहीर आवाहन केले असून थकबाकीदारांना नोटीस देऊन सुद्धा कर भरण्याकडे काना डोळा केला जात आहे, आत्तापर्यंत घरपट्टी ४९ % वसुली करण्यात आली असून पाणीपट्टी ३३% वसुली करण्यात आली आहे. घरपट्टीची चालूमागणी व थकीत एकूण रक्कम जवळपास ८० लाख येणे बाकी असून पाणीपट्टीची चालू मागणी व थकीत असे एकूण रक्कम दीड कोटीच्या आसपास येणे बाकी आहेत याचा परिणाम नगरपंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर व विकास कामावर होत आहेत. त्या अनुषंगाने मुख्याधिकारी अमोल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली थकबाकीदारांचे नळजोडणी खंडित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक १२/३/२०२५ रोजी विशेष पथक नेमून ८ थकीत नळधारकांचे जोडणी खंडित करण्यात आले असून यापुढे देखील अशाप्रकारे नळ जोडणी खंडित किंवा मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येईल. तरी थकबाकीदारांनी त्वरित कराचा भरणा करावा तसेच नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून शनिवार व रविवारी देखील नगरपंचायत कार्यालय सुरू राहणार आहेत. तरी सर्व मालमत्ताधारकांनी घरपट्टी व पाणीपट्टी तसेच व्यापारी संकुलाचे चालू व थकीत कर भरून नगरपंचायतीस सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी निफाड यांनी केले आहे.

# महिलांनी शिक्षणाबरोबर आपल्या पाल्याला सुसंस्कारांची सांगड घालावी - प्राजक्तताताई धस

## पुरूष युवा पत्रकार संघाने महिलांचा सन्मान केला त्यांचे कार्य कौतुकास्पद - उपविभागीय अधिकारी वसिमा शेख

**दैनिक युवक आधार**
**आष्टी। प्रतिनिधी**



महिलांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता शिक्षणाबरोबर संस्काराची सांगड घालावी आणि कौटुंबिक आर्थिक परिस्थितीच्या प्रगती करण्यासाठी महिलांनी पुरुषाच्या बरोबर आपला संसाराचा गाडा अधिक जोमाने न्यायला पाहिजेत. तसेच आपल्या मुलामुलींच्या शिक्षणासह सोबत संस्काराकडे लक्ष दिले पाहिजे.मुलींनो सैराट चित्रपट पहा पण सैराटचा शेवटचा भाग दहावेळा पहा त्यामुळे विचार करून निर्णय घ्यावा आणि आपल्या शिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित करून काही तरी अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करा तर आज महिला सर्वच क्षेत्रात प्रगती करत असून देश महासत्ता होण्यासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील महिलांनी व्यवसायासह अत्याधुनिक शेती व नोकरी आदी क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करणे गरजेचे आहे आणि महिलांचे सक्षमीकरण व सशक्तीकरण काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्तताई सुरेश धस यांनी आष्टी येथे केले. आष्टी येथील पंचायत समितीच्या सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त ३० विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस, तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकर,सरपंच शालिनी मुळे, महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा गि–हे, सरपंच प्रतिभा थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना प्राजक्ताताई धस म्हणाल्या की, युवा पत्रकार संघ नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी तळागाळातील महिलांचा सन्मान करून एक स्तूत्य उपक्रम राबवत आहेत.कोणीही अन्याया विरुध्द लढत असताना त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. मग ती छोट्या घरातील महिला असो किंवा माझ्यासारखी राजकिय घराण्यातील असो जेव्हा माझ्यावर अट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करून मला त्यामध्ये गोव्यण्याचा प्रयत्न करण्यात आला होता ज्यांनी मला त्रास दिला त्या विरुध्द मी एक महिला असूनही माझ्यावर झालेल्या अन्याया विरोधात मी ताकतीने आवाज उठविला आणि मला न्यायदेवताने न्याय दिला आणि मला त्रास देणाऱ्याची आज काय अवस्था झाली आहे हे सर्व बीड जिल्ह्यातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे त्याची फेड त्याला लगेच मिळाल्याचे त्यांनी बोलताना मनातील भावना व्यक्त करून सांगितल्या. यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी वसीमा शेख म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाला छेद देणारा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम आज महिलांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.अशा कर्तबगार महिलांचा जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते परंतु आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा जागतिक महिला दिनानिमित्ताचा महिला पत्रकार नसताना ही पुरुष पत्रकार बांधवांनी सर्व कार्यक्रमाला छेद देणारा कार्यक्रम घेतला आणि मागिल अनेक वर्षांपासून पुरुषांनी महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम मी पहिल्यांदाच पाहत आहे.आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील महिलांना पुरस्कार देऊन सन्मान केला. महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे महिला अत्यंत धाडसी कामे करतात.पुरूषाच्या बरोबरीने आज महिला काम करत आहेत.तळागाळातील उत्कृष्ट कार्य करत आहेत. अशा महिलांमुळे समाजातील महिला मुलींना प्रेरणा मिळत राहते असे त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर,गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, जिजाऊ ब्रिगेडच्या अहिल्या नगरच्या जिल्हाध्यक्षा अड स्वाती जाधव,ग्राम महसूल अधिकारी अंकीता जाधव यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव जावेद पठाण, निसार शेख,अक्षय विधाते,समीर शेख, गहिनीनाथ पाचबैल, संतोष नागरगोजे, मारुती संत्रे,अतुल जवणे, प्रेम पवळ, संतोष तांगडे, सोपान पगारे, आदिनाथ ठोंबरे,संतोष दाणी, राजेंद्र लाड, सिताराम पोकळे,विठ्ठल राख, सचिन पवार, शिक्षक अनिल बेदरे,किरण शिनगिरे, विजय राजपुरे, ओंकार कदम, संस्कार लाड,आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर शेख यांनी केले तर या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन राजेंद्र लाड यांनी केले व आभार अविनाश कदम यांनी मानले.

## आष्टी येथे नारी सन्मान पुरस्काराने कर्तबगार ३० महिलांचा सन्मान

### युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा - तहसीलदार वैशाली पाटील

बालविवाह रोखण्यासाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा आहे त्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची माहिती सर्व पालकांपर्यत पोहचून याबाबत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे तर
युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी आष्टी तालुक्यात सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवले आहेत तसेच सर्वसामान्य गोरगरीब अन्याय विरोधात वाचा फोडण्याचे काम करत आहेत.आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अनेक महिला ह्या उत्कृष्ट कार्य करून ही त्यांची दखल घेतली गेली नव्हती. आज युवा पत्रकार संघाने कर्तुत्वान महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करून त्यांना न्याय दिला. त्यामुळे युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे प्रतिपादन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले.

**या महिलांचा झाला पुरस्काराने सन्मान...**

वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), अड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), अड पुष्पा भगत– गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर–धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर), सौ. ज्योती संजय पवार
आदर्श अबॅकस शिक्षिका,श्रीमती वेणूबाई विलास केसकर आदर्श स्वयंपाकी या विविध क्षेत्रातील महिलांना शाल, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२५' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.